Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

Approved as a text book by the Education Department, Central Provinces & Berar.



66 म
90

प्रकाशक—
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar
…एज्युकेशनल बुकडेपो, जबलपूर, नागपूर, उमरावती.

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

❀ ओ३म ❀

पुस्तक-संख्या 66म
१०२ख

पंजिका-संख्या २११०६/23.2.2002

पुस्तक पर सर्व प्रकार की निशानियां लगाना वर्जित है। कोई महाशय १५ दिन से अधिक देर तक पुस्तक अपने पास नहीं रख सकते। अधिक देर तक रखने के लिये पुनः आज्ञा प्राप्त करनी चाहिये।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मध्यप्रांतांतील प्राथमिक शाळांकरिता मंजूर झालेली

सुलभ वाचनपाठमाला

मराठी दुसरें पुस्तक

CHECKED 1973

संपादक—

गंगाधर गोविंद कानेटकर, एम्. ए.
प्रोफेसर, स्पेन्स् ट्रेनिंग कॉलेज, जबलपूर.

स्टाक प्रमाणीकरण १९८४

ब. पं. तांदळे
शिक्षक, नार्मल स्कूल, वर्धा.

प्रकाशक—

सी. पी. अँड बरार एजुकेशनल बुकडेपो,
जबलपूर, नागपूर, अमरावती.

66 म
२११०६ ग
10 (व)
23.2.2002

आठवी आवृत्ति

१९५३

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हें माझें पुस्तक आहे.

माझें नांव ....

....

माझी शाळा ....

माझें गाव ....

माझी तहसील ....

माझा जिल्हा ....

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रस्तावना

प्रस्तुत वाचन-पाठमाला मध्यप्रांतांतील प्राथमिक शाळांच्या पहिल्या चार वर्गांकरिता खास रचण्यांत आली आहे. मध्यप्रांतांत सन् १९२६ सालापासून आतांपर्यंत चालू असलेली "सामान्यज्ञानप्रवेशिका" भाग १-२ हीं पुस्तकें स्वतंत्र स्वरूपांत पुरवणी पाठ्यपुस्तकें म्हणून यापुढें चालू राहू नयेत, व त्यांमधील प्रमुख विषयांचा समावेश होतां होईतों एकाच वाचनपाठमालेंत व्हावा, असा इ. स. १९३० सालीं नेमलेल्या कमिटीने अभिप्राय दिला; त्या अभिप्रायास अनुसरून भाषाज्ञान, चारित्र्यसंवर्धन, मानवी स्वभावाचें दिग्दर्शन यांबरोबरच भोवतालच्या परिस्थितीचें ज्ञान देणारे पाठहि प्रस्तुत पुस्तकांत घातले आहेत.

पाठ सुलभ व मनोरंजक होतील अशी शक्य तितकी काळजी घेतली आहेत. इंग्रजींतील उत्कृष्ट बालवाङ्मय व शालोपयोगी क्रमिक पाठ्यपुस्तकें यांचें अवलोकन करून त्यांतील उपयुक्त कल्पनांचा होईल तितका उपयोग प्रस्तुत मालेंत करण्याचा यत्न केला आहे. तो कितपत साधला आहे, हें ठरविण्याचा अधिकार तज्ज्ञांचा आहे.

अलीकडे मराठींत चांगलें बालवाङ्मय निर्माण होऊं लागलें आहे, ही अभिनंदनीय गोष्ट आहे. अशा बालोपयोगी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गद्य व पद्य वाङ्मयांतून उत्कृष्ट उतारे देण्याचा उपक्रमहि प्रस्तुत मालेंत केला आहे. या प्रयत्नास उदारपणें साहाय्य करणारे कवि, लेखक व प्रकाशक या सर्वांचा संपादक आभारी आहेत. नवीन रचना करतांनाहि जुन्यांतील उत्कृष्ट वाङ्मयाकडे दुर्लक्ष होतां कामा नये, असें प्रस्तुत संपादकांचें मत आहे. त्यास अनुसरून मुंबईकडील जुनीं वाचन पुस्तकें व या प्रांतांतील जुनीं वाचन पुस्तकें यांमधील कांही पाठ थोडा फरक करून जशाचे तसेच कायम ठेवले आहेत. खरें चांगलें वाङ्मय जुनाट व टाकाऊ असें कधीच होत नाही.

प्रस्तुत पुस्तकमाला तपासून मंजूर करण्यासाठीं मध्यप्रांत-विद्या-खात्याने जी खास कमिटी नेमली होती तिने ज्या महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केल्या यांबद्दल संपादक तिचे फार आभारी आहेत.

मे. डिसिल्व्हा साहेबांनीं मंजूर केलेल्या शब्दसंग्रहाचा उपयोग करून धड्यांचे शेवटी नवीन पद्धतीचे प्रश्न घालून ही आवृत्ति शिक्षकांना व विद्यार्थ्यांना अधिक उपयोगी होईल अशी काढण्यांत आली आहे.

—संपादकद्वय.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मराठी दुसरें पुस्तक

अनुक्रमणिका

धड्यांचें नांव	पृष्ठ
१ चिमुकला नमस्कार (कविता)	१
२ खरा बालवीर	२
३ म्हातारा व त्यांचीं मुलें	४
४ अंग व कपडे स्वच्छ ठेवा !	७
५ रामटेकची जत्रा	१०
६ मनी आणि मोत्या (कविता)	१४
७ आमचें घर	१६
८ संत्र्याचें झाड	२०
९ मीच तेवढा रिकामा ना !	२४
१० सूर्य, चंद्र व तारे	२७
११ मोत्या कुत्र्याची कामगिरी	३१
१२ गवळी (कविता)	३५
१३ पक्षी	३७
१४ बाळूची सर्कस	४२
१५ माझें जेवण	४५
१६ गांवठी उंदीर व शहरचा उंदीर	४८
१७ धानाची पेरणी	५१
१८ माझी बाहुली (कविता)	५४

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१९	आंधळे व हत्ती	५५
२०	मीठ	५८
२१	दरबार-दिन	६१
२२	झाडें	६५
२३	बकासुराची गोष्ट	६९
२४	गुलाब-कळी (कविता)	७२
२५	छोटें रामायण (भाग १ ला)	७३
२६	छोटें रामायण (भाग २ रा)	७६
२७	वारा	७८
२८	गड आला, पण सिंह गेला	८१
२९	अंगाई गीत (कविता)	८४
३०	लोकर	८५
३१	टापटीप	८७
३२	रणशूर बाजी देशपांडे	९०
३३	ओझें उचलण्याची युक्ति	९३
३४	आई मज करमत नाही	९६
३५	कापसाचें शेत	९८
३६	दामू उंदीरे	१०१
३७	दळण्याची चक्की	१०४
३८	खार (कविता)	१०७
३९	दुबळी श्रीमंती व धट्टीकट्टी गरीबी	१०९
४०	झोपडींतील पाहुणचार	११२
४१	चला, सुटी झाली ! (कविता)	११६

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



रामचंद्राचा वनवास

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मराठी दुसरें पुस्तक.

धडा पहिला.

चिमुकला नमस्कार.

(कविता)

सकलहि जग देवा ! निर्मुनी पाळतोसी।
दिससि न, तरि सर्वां तूं सदा पाहतोसी ॥
मम हृदय शिशूचें, शक्ति न ज्ञान मातें।
नमन करितसें मी, मान्य होवो तुला तें ॥

ना. गं. लिमये.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा दुसरा.

खरा बालवीर.

एक मनुष्य तांग्यांत बसण्याच्या गडबडींत होता. तेव्हा त्याच्या खिशांतून पैशांचें पाकीट खाली पडलें. तें त्याच्या ध्यानांत आलें नाही. तो तसाच तांग्यांत बसला व तांगा चालूं लागला. पण ही गोष्ट एका बालवीराच्या नजरेस आली. तो तें पाकीट उचलून घेऊन तांग्यामागे पळत सुटला. लवकरच त्याने तांग्याला पकडलें.



मालकाच्या हातांत तें पाकीट दिलें. तेव्हा तो मनुष्य म्हणाला, "शाबास ! मुला, तूं माझें मोठेंच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

काम केलेंस. ह्या पाकिटांत माझे पन्नास रुपये आहेत. हा घे तुला एक रुपया बक्षीस !"

बालवीराने थोडा वेळ मनाशीं विचार केला की, मी रोज एक उपकार करीन अशी शपथ घेतली आहे. त्याबद्दल बक्षीस घेणें बरें नाही. असा विचार करून बक्षीस न घेतां तो बालवीर नमस्कार करून निघून गेला.

प्रश्न

(१) खरें किंवा खोटें हें लिहा.

(१) मनुष्याच्या खिशांतून पैशांचें पाकीट खाली पडलें..........

(२) बालवीराने बक्षीस घेतलें..........

(२) रिकाम्या जागीं योग्य शब्द भरा.

(१) हा घे तुला एक.........बक्षीस.

(पैसा, आंबा, रुपया.)

(२) बालवीर..........करून निघून गेला

(सलाम, नमस्कार, काम)

(३) पुढील वाक्यें बरोबर लिहा.

(१) आहेत रुपये पाकिटांत ह्या माझे पन्नास.

(२) करीन एक मी उपकार रोज.

(४) पुढील शब्द शुद्ध लिहा.

खिसांतुन, बकशीस, सपथ.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा तिसरा.

म्हातारा व त्याचीं मुलें.



एका गृहस्थास चार मुलगे होते. ते नेहमी आपसांत भांडत असत. बापाने कितीहि सांगितलें तरी ऐकत नसत.

शेवटी त्या महाताऱ्या गृहस्थाने एक युक्ति केली. तो म्हणाला, "मुलांनो, मजकरितां थोड्या काड्या घेऊन या पाहूं!" मुलांनी काड्या आणल्या.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म्हातारा म्हणाला, "या काड्यांची एक जुडी बांधा" मुलांनी तसें केलें.

मग म्हातारा म्हणाला, "बाळांनो, तुमच्यापैकीं ही जुडी कोण मोडूं शकतो पाहूं!"

प्रत्येकाने जुडी घेतली व खूप जोर लावून ती मोडण्याची खटपट केली. कोणालाच ती मोडतां येईना.

नंतर त्या काड्या त्याने वेगवेगळ्या काढून, एक एक काडी प्रत्येक मुलास मोडावयास सांगितली. ती त्यांनी पटापट मोडून टाकली.

तेव्हा तो म्हातारा गृहस्थ म्हणतो, "पाहा, माझ्या लाडक्या मुलांनो! बारीक बारीक काड्या पण त्या एकमेकींना धरून होत्या, तोंपर्यंत कोणास मोडतां आल्या नाहीत; पण त्याच वेगळ्या वेगळ्या होतांच तुम्हीं पटापट मोडून टाकल्या. असे तुम्ही मिळून मिसळून वागा. म्हणजे तुमचें सगळ्यांचें हित होईल."

मुलांना आपली चूक कळून आली व ते मिळून मिसळून वागूं लागले.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रश्न

(१) चूक किंवा बरोबर हें लिहा.

(१) म्हाताऱ्याने जें सांगितलें तें त्याचीं मुलें ऐकत असत............

(२) तीं मुलें मिळून मिसळून वागूं लागलीं......

(२) चुकीचे शब्द खोडा.

(१) प्रत्येकाने जुडी मोडण्याची $\frac{\text{मेहनत}}{\text{खटपट}}$ केली.

(२) मजकरितां $\frac{\text{पुष्कळ}}{\text{थोड्या}}$ काड्या घेऊन या.

(३) समानार्थी शब्द लिहा.

खूप—	हित—
युक्ति—	आपसांत—

(४) स्मृति चांचणी—

(१) म्हातारा व त्याचीं मुलें ही गोष्ट सांगा.

(२) मिळून मिसळून राहिल्याने कोणता फायदा होतो ?

(५) वाक्यांत उपयोग करा.

पटापट, जुडी, चूक, हित.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा चौथा.

अंग व कपडे स्वच्छ ठेवा !

बाबू रोज शाळेला उशीराने यावयाचा व आला म्हणजे त्याचें अंग व कपडे पाहावे, तर अगदीं घाणेरडे असावयाचे. मास्तरांनी त्याला पुष्कळ वेळां सांगितलें; पण त्याचें आपलें तसेंच. शेवटी ते रागावले व म्हणाले, "बाबू, मी तुला आज वर्गांत बसूं देत नाही. तूं परत घरीं जा; तुझें अंग व कपडे स्वच्छ दिसतील तरच मी तुला उद्यां शाळेंत घेईन."

बाबू रडत घरीं गेला. त्याच्या घरीं त्याच्या आई खेरीज कोणी नव्हतें व घरची गरिबीहि फार होती. मुलाला शाळेंतून घालवून दिल्यामुळे तिला फार वाईट वाटलें. ती शेजारच्या नारोपंताकडे गेली व म्हणाली, "पहा हो पंत, काय हा मास्तरांचा आम्हां गरिबांवर जुलूम ! कपडे स्वच्छ नाहीत म्हणून माझ्या मुलाला ते शाळेंत घेत नाहीत. कोठचे आणावे स्वच्छ कपडे आम्हीं गरिबांनी !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नारोपंत—वारूबाई, किती वेडी समजूत तुमची ही ! मास्तर काय भारी किंमतीचे कपडे आणायला सांगतात तुम्हांला ? ते फक्त स्वच्छ कपडे घाला, असें सांगतात. बरें, कपड्यांचें असो. पण नाक, तोंड, अंग हीं स्वच्छ ठेवण्याला तर कांही खर्च लागत नाही ? पाणी तर फुकटचें मिळतें ना ? मग सकाळीं उठल्यावर शौच करून व तोंड, नाक, डोळे वगैरे स्वच्छ धुऊन शाळेंत जाण्यांत कठीण तें काय ? कपडे सुद्धा, रोज नाही तरी एक दोन दिवसांनी धुतले म्हणजे फार घाण होत नाहीत. याला फार पैसे लागत नाहीत. पण थोडी मेहनत मात्र पडते. आळसामुळे मुलें घाणेरडीं राहातात. तुम्ही नको का आपल्या मुलाला चांगल्या सवयी लावायला ? स्वच्छतेचे फायदे दोन—

१ स्वच्छतेने माणूस सुंदर दिसतें.

२ स्वच्छतेने रोगराई टळते. कारण घाणीपासून बहुतेक आजार होतात.

वारूबाईला आपली चूक कळून आली व तिने मुलाच्या स्वच्छतेकडे लक्ष देण्यास सुरुवात केली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रश्न

(१) होय किंवा नाही हें सांगा.

(१) बाबू रोज स्वच्छ कपडे घालून येत असे काय ?.........

(२) स्वच्छतेने माणूस सुंदर दिसतें काय ?......

(२) रिकाम्या जागीं योग्य शब्द लिहा.

(१) स्वच्छतेने.........टळते.

(बिमारी, रोगराई, घाण)

(२) मास्तर.........कपडे आणायला सांगतात.

(चांगले, मळके, भारी किंमतीचे)

(३) विरुद्ध अर्थाचे शब्द लिहा.

भारी—	उद्यां—
रडत—	गरिबी—

(४) कारण सांगा.

(१) स्वच्छतेने रोगराई टळते. कारण—

(२) पाणी तर फुकटचें मिळतें. कारण—

(५) मुलांनो तुम्ही आपल्या लहान भावांना, स्वच्छतेने राहावयाला कसें सांगाल ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घडा पांचवा.

रामटेकची जत्रा.



रामटेक हें प्रख्यात देवस्थान नागपूरापासून सुमारें पंचवीस मैलांवर आहे. तेथे दरवर्षी चैत्रांत व कार्तिकांत जत्रा भरतात. यंदा कार्तिकाच्या जत्रेला बळिरामपंत आपल्या मुलांसह गेले होते. यात्रेहून आल्यावर त्यांना शामराव भेटले. त्यांनी विचारलें, "कसें काय बळिरामपंत ? झाली जत्रा ? आम्हांला सांगा तर खरी काय काय मौज तुम्हीं पाहिली ती ?"

बळिरामपंत—मौज काय विचारता ? यंदा जत्रेंत माणसांची खूप गर्दी होती. रामटेक गाव टेकडीच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पायथ्याशी आहे व मंदिरें टेकडीवर आहेत. पायथ्याशी अंबाला नांवाचा तलाव आहे. तेथून देवळापर्यंत पायऱ्या आहेत. हा सर्व भाग आज माणसांनी भरून गेला होता. देवाचें दर्शनसुद्धा मोठ्या कष्टाने झालें.

शामराव——मग तुम्हांला बराच त्रास झाला असेल या गर्दीचा ?

बळिरामपंत——हो, थोडा झाला खरा ! पण जत्रेची गंमत ही कांही वेगळीच आहे. जिकडे तिकडे दुकानें होतीं. जणूं कांही नागपूरची इतवारी पेठच तेथे लागली होती ! पाळण्यांत बसून मुलांनी झोके घेतले, मौजेचीं खेळणीं व खाऊ खरेदी केला. सर्वांत चैन आज खरोखर मुलांचीच होती !

शामराव——बरें, पण गडावर पाहाण्यासारखीं ठिकाणें कोणतीं आहेत ?

बळिरामपंत——गडावर मुख्य मंदिरें दोन आहेत. एक श्रीरामचंद्राचें व त्याच्यामागे लक्ष्मणाचें. हीं पुष्कळ जुनाट आहेत असें म्हणतात, शिवाय लहान लहान मंदिरें पुष्कळ आहेत. सर्व देवळांभोवती तट

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे. देवळांना सफेती दिली असल्याने तीं पुष्कळ अंतरावरून दिसतात.

गडावरील उंच जागेवरून पाहिलें असतां भोवतालचा देखावा फार मौजेचा दिसतो. पावसाळा नुकताच होऊन गेल्यामुळे चोहोकडे हिरवींगार रानें होतीं. त्यांमधील लहान लहान तलाव आरशा-प्रमाणे चकाकत होते. परत येण्यापूर्वीं आम्हीं जवळच असलेला खिंडशीचा फार मोठा तलाव पाहिला. सूर्य बुडण्याच्या वेळीं त्याचा देखावा फारच छान दिसतो. या तलावाचें पाणी पाटांनी भोवतालच्या शेतीस दिलेलें आहे.

प्रश्न

(१) चूक किंवा बरोबर हें लिहा.

(१) रामटेक नागपूरापासून पंचवीस मैलांवर आहे. ………

(२) रामटेक गाव टेकडीच्या माथ्यावर आहे. ……

(२) विरुद्ध अर्थाचे शब्द लिहा.

टेकडी—	पायथा—
उंच—	[illegible]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(३) पुढील शब्द शुद्ध लिहा.

कारतीक, अवंदा, दर्सन, तरास.

(४) पुढील शब्द वाक्यांत घाला.

अंबाला, सफेत, पावसाळा, मंदिरें.

(५) स्मृति चांचणी—

(१) रामटेकास काय पाहण्यासारखें आहे ?

(२) रामटेकास कोणते तलाव आहेत ?

(३) सूर्य बुडण्याच्या वेळेला काय म्हणतात ?

(४) मराठी महिन्यांचीं नांवें सांगा.

(६) कृतिपर—

देवळाचें चित्र, टेकडी, तलाव वसंध्या काळचा देखावा यांचीं चित्रें काढा. रंग भरा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मनी आणि मोत्या.

(कविता)

मनीः—

मनी आमुची भाटी । आहे मोठी चोरटी
मुलूखाची खादाड । द्वाड आणि बेरड
हिंडे बंगला सारा । धुंडी कोना कोपरा
खाई झाकली साय । काढी हलके पाय
खाली कोठींत जाई । झोप निवांत घेई
लपे अंधारामाजीं । तेवे डोळ्यांत तेजी
मिशा पिंजारी रागें । शेप ताठवी मागे
'म्यॉंव म्यॉंव' ओरडे । नखें घे ओरखाडे
वाघोबाची 'मावशी' । वैर ईचें 'मामा' शी
नको ईची सोबत । दुष्ट कपटी जात

मोत्याः—

परी आहे हा मोत्या । किती ईमानी जात्या
नसे कशाची खोड । भारी स्वभाव गोड
दारीं बसे बिचारा । देई खडा पहारा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खाई दिली भाकरी। नेमें करी चाकरी
कधी ये ना घरांत। सदा राहे जागत
काळ्या रातीं बेरातीं। फिरे बंगल्याभोंती
प्रेमें अंगास चाटी। लाडें वारी शेपटी
मोदें नाचे, किंचाळे,
खेळे करीत चाळे
याचें सर्वांशी पटे
मात्र मनीशी फाटे
मैत्री याची चांगली
खरी विश्वासु कुळी

भ. श्री. पंडित.

प्रश्न

(१) मनींचे गुण सांगा.
(२) मोत्याचे गुण सांगा.
(३) मांजरीला वाघाची मावशी कां म्हणतात ?
(४) मोत्याचें सर्वांशी कां पटतें ?
(५) तुम्हीं मनी व मोत्या यांपैकी कोणास पाळाल ? का ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा सातवा.

आमचें घर.



वसंताचें घर नवीनच बांधून झालें होतें व तो नुकताच त्यांत राहूं लागला होता. त्याने एके दिवशीं आपले खेळगडी वासू व गणू यांना घर दाखविण्यासाठी बोलाविलें. तो म्हणाला—

"चला, मी तुम्हांला आमचें नवें घर दाखवितों. ही पहा समोरची ओसरी. इच्या दोन्ही बाजूंस दोन खोल्या आहेत. ओसरीच्या मागे आमच्या घरांतील

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुख्य दिवाणखाना आहे. पाहिलेंत तसबिरी व आरसे लावून याला कशी शोभा आणली आहे ? येथे टेबलें. खुर्च्या वगैरे लाकडी सामानहि आहे. कोणी मंडळी बाबांच्या भेटीला आली म्हणजे येथेच बसतात. बाबांची बैठकहि नेहमी येथेच असते.

दिवाणखान्याच्या मागल्या बाजूस पुढल्यासारखी एक पडवी आहे. पडवीच्या पुढे एक मोठा चौक आहे. चौकाच्या एका बाजूस ओळीने तीन खोल्या आहेत. त्यांपैकी शेवटची खोली म्हणजे आमचें स्वयंपाकघर. त्याच्या अलीकडच्या खोलींत आम्ही जेवावयास बसतों व तिच्या शेजारीं धान्य वगैरे ठेवण्याची कोठी आहे.

चौकाच्या दुसऱ्या बाजूसहि तीन खोल्या आहेत. एक आमची मुलांची अभ्यासाची खोली. त्याच्या पलीकडे देवघर आहे व त्याच्या पलीकडे नहाणीघर.

चौकाच्या मागच्या बाजूला नुसती उघडी पडवीच आहे व तिला मागे दरवाजा आहे. त्यांतून बाहेर पडलें, म्हणजे शौचकूप दिसतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आमच्या घराला फक्त एक ऐसपैस मोठी माडी आहे. ती दिवाणखान्यावर असून तिच्या मागील बाजूस उघडी गच्ची आहे. गच्चीवरून शहराची शोभा फार छान दिसते.

आमच्या घरांत उजेड व हवा भरपूर येतात. या पाहिल्यात खिडक्या कशा मोठमोठ्या आहेत ! त्यांना काचा लाविल्या आहेत. त्यामुळे खिडक्या बंद केल्या तरी उजेडाला कमी नाही."

गंणू, वासू म्हणाले, "खरेंच वसंत, फार चांगलें घर आहे तुझें. आमच्या घरीं नाही इतकी जागा. आम्ही तुजकडेच खेळावयास येत जाऊं."

वसंत म्हणाला, "वा ! फार चांगलें. आमच्या मागील अंगणांत छान जागा आहे खेळायला. मात्र बगीच्यांतील झाडांना नाही हो हात लावायचा आणि विटी किंवा चेंडू यांनी काचा नाही फोडावयाच्या. बाबांनी सांगितलें आहे कीं, असे खेळ मैदानांत खेळावे म्हणून."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रश्न

(१) खरें किंवा खोटें हें लिहा.

(१) वसंताचें घर जुनेंच बांधलेलें होतें. ....

(२) विटी किंवा चेंडू असे खेळ मैदानांत खेळावे. ....

(२) चुकीचे शब्द खोडून काढा.

(१) आमच्या घराला फक्त एक लहानशी / पेसपैस माडी आहे.

(२) गच्चीवरून शहराची शोभा फार वाईट / छान दिसते.

(३) रिकाम्या जागीं योग्य शब्द लिहा.

(१) ओसरीच्या मागे आमच्या घरांतील मुख्य ....आहे.

(माडी, दिवाणखाना, खोली)

(२) खिडक्यांना ......लाविल्या आहेत.

(लाकडी पाट्या, काचा, कागद)

(४) उजेड, हवा, भरपूर हे शब्द घेऊन एकच वाक्य तयार करा.

(५) अशुद्ध वाक्यें बरोबर लिहा.

(१) खिडक्यांना काच लावले आहे.

(२) सेहराची सोभा श्यान दिसतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा आठवा.

संत्र्याचें झाड.



नागपुरास नारायणरावांच्या घरीं कांही कामाकरितां त्यांचे पुण्याकडील नातलग गोविंदराव आले होते. दिवस माघफाल्गुनाचे होते व नागपूरच्या संत्र्यांचा मोसम अगदी बहारीचा आला होता. नारायणरावांच्या बंगल्याच्या आवारांतच शेंपन्नास झाडें संत्र्यांचीं होतीं, तीं या वेळीं फळांनी अगदी लवून गेलीं होतीं. जेवण झाल्यावर चांगल्या चांगल्या संत्र्यांनी भरलेली एक लहानशी टोपली पाहुण्यांच्या पुढे आणून ठेवून नारायणराव म्हणाले—

"घ्या हो, गोविंदराव ! थोडी मुखशुद्धि करा. पहा तर खरी आमच्या नागपुरी संत्र्यांची मजा !"

गोविंदराव तीं संत्रीं खाऊन अगदी खूष होऊन गेले. ते म्हणाले, "वाः ! फारच चवदार आहेत बुआ ! किती रसदार व मधुर आहेत हीं ! आमच्या पुण्याकडे संत्रीं मिळतात; पण त्यांस अशी रुचि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नसते ! एकेका गांवच्या हवापाण्याचाच हा गुण म्हणावयाचा !

नारा०—खरें आहे तुमचें म्हणणें. संत्र्यांना जरा उष्ण व कोरडी हवा लागते व जमीनहि पाणी झिरपून जाणारी म्हणजे जरा रेताड लागते. शिवाय पाणीहि भरपूर लागतें. चला तुम्हांला आमच्या बगीच्यांतील संत्र्यांचीं झाडें दाखवितों.

मग दोघे जणें बगीचाकडे गेले. बगीचा दाखवीत दाखवीत नारायणराव म्हणाले, हीं पाहिलींत झाडें कशीं हल्लीं फळांनी लदलेलीं आहेत ! यांना वर्षांतून दोन वेळां बहर येतो. पहिला मार्गशीर्ष पौषाचा हंगाम. हा नाताळच्या सुमारास येतो. या वेळचीं फळें जरा आंबट असतात. दुसरा माघ फाल्गुन चैत्रांतील हंगाम. हाच बहारीचा असतो. या वेळचीं फळें मधुर व चवदार असतात.

गोविंद०—पण का हो नारायणराव, संत्रें म्हणजे लिंबांचीच जात नव्हे का ? ह्याची लागवड कशी करतात याविषयीं थोडी माहिती सांगाना आम्हांला.

नारा०—होय. संत्रें, मुसंबें, ईडलिंबू, पपनस

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हीं सर्व लिंबाच्या जातींतीलच फळें होत. पण प्रत्येकाची रुचि, रंग, बनावट हीं वेगळीं. संत्र्याचीं बियें प्रथम कुंड्यांत लावून त्यांचीं रोपें तयार करतात. मग तीं जमिनींत लावतात. त्यासाठी प्रथम चांगले कमरेइतके खोल खड्डे खणून, त्यांत झाडपाल्याचें खात, राख, जनावरांचीं हाडें वगैरे घालून, त्यांवर एक जाडसा रेताड मातीचा थर देतात व मग पावसाळ्याच्या सुमारास त्यांत रोपें लावतात. रोपें फार जवळ जवळ लावूं नयेत. एका एकर जमिनींत फार तर शंभर एक झाडें लावावीं. अळ्यांत पाणी तुंबून राहूं देऊं नये. पहिल्या वर्षी दोन किंवा तीन दिवसांआड पाणी देण्यास चुकूं नये. झाडें मोठीं झालीं म्हणजे जरा उशिराने पाणी दिलें तरी चालेल. वर्षांतून एकदा शेणाचें खात दिलें तर फार चांगलें. झाड चार पांच वर्षांचें झालें म्हणजे फळें येऊं लागतात व चांगलें झाड तर तीस चाळीस वर्षांपर्यंत फळें देतें. एकेका झाडाला ४००-५०० पर्यंत फळें येऊं शकतात. पण हें सर्व झाडांची चांगली काळजी राखली तर. झाडावरच्या किडीला फार जपावें लागतें.
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बियांचीं रोपें बनवून लावण्यापेक्षा कलमें करून बनविलेलें रोप फार चांगलें. अशीं कलमी रोपें येथील महाराज बागेंत मिळतात, संत्र्याचें झाड फारसें उंच होत नाही. पण तें वाटोळें गरगरीत फार छानदार दिसतें.

प्रश्न

(१) खरें किंवा खोटें हें लिहा.

(१) संत्र्यांना जरा उष्ण व कोरडी हवा लागते.—

(२) माघ, फाल्गुन चैत्रांतील संत्रीं मधुर व चवदार नसतात.…………

(२) स्मृति चांचणी—

(१) मराठी महिन्यांचीं नांवें सांगा.

(२) संत्र्याच्या जातीचीं फळें कोणतीं ?

(३) संत्र्यांचीं झाडें कशीं तयार करतात ?

(३) रिकाम्या जागीं योग्य शब्द लिहा.

(१) पहा तर खरी आमच्या…………संत्र्यांची मजा.

(रायपुरी, पुणेरी, नागपुरी)

(२) बंगल्याच्या……शेंपन्नास झाडें………होतीं.

(अंगणांत, लिंबाचीं, आंब्याचीं, मैदानांत आवारांत संत्र्यांची)

(४) कृतिपर—

(१) आंबा, संत्रें, लिंबू यांचीं चित्रें काढा. त्यांना रंग द्या.

(२) कुंडी, संत्र्याचें पान, आंब्याचें पान काढा. व तें कैचीनें कापा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा नववा.

मीच तेवढा रिकामा ना !

दिनू फार उनाड मुलगा होता. तो शाळेला जाण्याचा कंटाळा करी. शाळेला जातों म्हणून घरून निघे व कोठेंतरी खेळत बसे. एके दिवशीं त्याला खेळायला कोणी सोबतीच मिळेना.

एक मधमाशी या फुलावरून त्या फुलावर गुं गुं करीत असलेली त्याने पाहिली.

दिनूने तिला विचारलें, "माझ्याबरोबर खेळायला येतेस ?"

मधमाशी बोलली, "छे रे बाबा, मला कोठे फुरसत आहे ? मला मध गोळा करायचा आहे ना ?"

पुढे एक चिमणी दिसली. दिनूने विचारलें, "चिमूबाई, माझ्याबरोबर खेळावयास येतेस का ?"

ती म्हणाली, "नाही रे बाबा ! पावसाळा जवळ आला. गवताची एकेक काडी जमवून मला घरटें बांधावयाचें आहे."

जरा पुढे एक कुत्रा भेटला. दिनू म्हणाला, "कुत्रोबा, खेळायला येतोस का माझ्याबरोबर ?"

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कुत्रा म्हणाला, "आलो असतों आनंदाने. पण वेळ कोठे आहे ! मला मालकाचें घर संभाळायचें आहे !"

अशा रीतीने जो जो भेटला, तो तो कामांत गुंतलेला. हें पाहून दिनू मनांत समजला. मधमाशी, चिमणी, कुत्रा कोणीच रिकामे नाहीत खेळायला ! आणि मीच तेवढा रिकामा ! पण रिकामा कसला ! काम सोडून मी खेळायला निघालों आहें ! खरेंच, मला आता लाज वाटते असें करण्याची !

तेव्हापासून दिनूने उनाडपणा सोडून दिला.

प्रश्न

(१) चूक किंवा बरोबर हें सांगा.

(१) दिनू फार चांगला मुलगा होता.·········

(२) मधमाशी बोलली, मला मध गोळा करायचा आहे ना ?·········

(३) कुत्रा म्हणाला, मी येतों तुझ्याबरोबर खेळायला.·········

(२) समानार्थी शब्द लिहा.

उनाड———	सोबती———
फुरसत———	मध———

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(३) शब्दांचा वाक्यांत उपयोग करा.

गुं गुं, एकेक, पावसाळा, लाज.

(४) रिकाम्या जागीं योग्य शब्द भरा.

(१) दिनूने ...... सोडून दिला (खेळणें, शिकणें, उनाडपणा)

(२) मला मालकाचें घर .... आहे. (पाहावयाचें, संभाळायचें, विकायचें)

(५) कृतिपर—

(१) उनाड मुलाचा संवाद करून दाखवा.

(२) कुत्रा, मधमाशी यांचीं चित्रें काढा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा दहावा.

सूर्य, चंद्र व तारे.



शंकरराव आपल्या मुलांना घेऊन शहराबाहेर फिरावयास गेले होते. संध्याकाळ होत चालली होती व सूर्य मावळण्याच्या बेतांत होता. तिकडे जनार्दनाचें लक्ष गेलें तो म्हणाला, "बाबा ! बाबा ! पाहा हा सूर्य कसा लाल गोळ्यासारखा दिसत आहे !"

शंकरराव—होय, किती सुंदर दिसत आहे या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वेळीं हा ! सकाळीं उगवतांनाहि असाच दिसतो तो. पण मग मात्र त्याच्याकडे पाहाण्याची सोय नसते. यावेळी याचे किरण किती कोवळे आहेत.

इतक्यांत सूर्य मावळला. हळू हळू अंधार पडत चालला. शंकरराव म्हणाले, "मुलांनो, जरा जलद चला आता. आजची रात्र अंधारी आहे. चांगलेंसें चांदणें नाही आज.

मंदाकिनी—हें कसें हो बाबा ? चंद्र का नाही रोज रात्रीं असत ? व तो आज इतका लहान का ?

शंकरराव—आज शुद्ध तृतीया आहे, यामुळे चंद्राची कोर लहानशी दिसत आहे. चंद्राची मौज अशी आहे की, पंधरा दिवस तो वाढत जातो. त्या पंधरवड्यास शुद्ध किंवा शुक्ल पक्ष म्हणतात. पौर्णिमेला तो पूर्ण वाटोळा होतो. मग दुसऱ्या पंधरवड्यांत तो हळू हळू लहान होत जातो व शेवटी एक दिवस मुळीच दिसत नाही. या दिवसाला अमावास्या म्हणतात व या पंधरवड्याला वद्य अथवा कृष्ण पक्ष म्हणतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जनार्दन---पण हें असें कां होतें ?

शंकरराव---हें तुम्हांला पुढे कळेल. सध्या मी तुम्हांला इतकेंच सांगतों कीं, चंद्राला कांही स्वतःचा उजेड नाही. त्याचा उजेड सूर्यापासूनच त्याला मिळतो व चंद्राच्या जेवढ्या भागावर सूर्याचा उजेड पडला असेल तेवढाच आपणांस दिसतो.

मंडळी आता अगदी घराजवळ आली होती. आता अंधार पडून चांदण्या चमचम करूं लागल्या होत्या !

शंकरराव---अंधेऱ्या रात्रीं या चांदण्यांची मात्र मौज असते. चांदण्या रात्रीं चंद्राच्या उजेडांत त्या फारशा दिसत नाहीत. पाहिलीत ती शुक्राची चांदणी कशी चमकदार दिसते आहे ! तो पहा ध्रुवाचा तारा. हा आपली जागा कधी सोडीत नाही.

मंदाकिनी---खरेंच बाबा, कशा हिरकण्यांसारख्या दिसत आहेत या चांदण्या ? किती दूर असतील हो या ?

शंकरराव---तेंहि तुम्हांला पुढेच कळेल, पण या चांदण्या म्हणजे फार दूरचे सूर्यच आहेत. फार दूर असल्यानेच ते इतके लहान दिसतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रश्न

(१) होय किंवा नाहीं हें सांगा.

(१) अंधेऱ्या रात्रीं चांदण्यांची मौज असते काय ?........

(२) पौर्णिमेला चंद्र पूर्ण वाटोळा असतो ?........

(३) चंद्राला स्वतःचा उजेड असतो ?........

(२) चुकीचीं वाक्यें खोडून टाका.

(१) चंद्र पंधरा दिवस वाढत जातो.

(२) सूर्यहि चंद्राप्रमाणें वाढत जातो.

(३) ज्या रात्रीं चंद्र मुळींच दिसत नाही त्या रात्रीला पौर्णिमा म्हणतात.

(३) उलट अर्थाचे शब्द लिहा.

उजेड———	अंधारी———
अमावस्या———	रात्र———

(४) स्मृति चांचणी—

(१) महिन्याचे दोन पंधरवाडे कोणते ?

(२) तिथींचीं नांवें सांगा.

(३) ध्रुवाचा तारा कोणत्या दिशेला दिसतो ?

(५) कृतिपर—

(१) पौर्णिमेचा चंद्र काढा.

(२) चांदण्या काढा.

(३) संध्याकाळचा देखावा काढा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घडा अकरावा.

मोत्या कुत्र्याची कामगिरी.



बाळू नांवाचा एक मुलगा होता. तो लहान सहा वर्षांचा असून फार खेळकर होता. त्याच्या घरीं मोत्या नांवाचा एक कुत्रा होता. बाळू दिवसभर त्याच्याशी खेळत असे.

एके दिवशीं सकाळीं गवळी दूध घेऊन आला. बाळूच्या आईने म्हटलें, "बाळू, दार उघड आणि दूध देऊन गवळी गेला म्हणजे तें पुनः लावून घे. विसरूं नको."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बाळूने दार उघडलें. गवळ्याने दूध दिलें व तो निघून गेला. बाळू दार बंद करण्यासाठी गेला; पण रस्त्यावर एक माणूस, बरोबर एक वानर व एक अस्वल घेऊन, "बंदर और रीछ का खेल देखो" असें ओरडत चालला होता; मग बाळूला दार बंद करणें कोठलें सुचावयाला ? तो त्या वानराचा व अस्वलाचा खेळ पहाण्यासाठी निघाला. त्याच्यामागे जातां जातां तो पुष्कळ दूर गेला, तरी तो माणूस खेळ करीना.

इतक्यांत बँडचा बाजा वाजवीत नाटकाच्या जाहिराती वाटणारा एक तांगा त्या रस्त्याने चालला होता, त्याच्यामागे "मला जाहिरात द्या, मला जाहिरात द्या" असें ओरडत कित्येक मुलें धावत होतीं. हें पाहून बाळूने वानराचा नाद सोडून त्या तांग्यामागे धावण्यास सुरवात केली. धावतां धावतां आपण कोणीकडच्या रस्त्याला आलों; येथून परत घराचा रस्ता सापडेल का नाही, याची बाळूला आठवण राहिली नाही.

शेवटी बाळू थकला. आता दहा वाजून गेले

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होते. बाळूने सकाळपासून कांही खाल्लें नव्हतें. त्याला सपाटून भूक लागली होती. घर कोठे राहिलें तें माहीत नाही. तो घाबरला व एका घराच्या बाहेरील ओट्यावर बसून रडूं लागला.

इतक्यांत त्याच्या गालाला कोणीं तरी हात लावल्यासारखें त्याला वाटलें. डोळे उघडून पाहातो तों आपला कुत्रा मोत्या ! तो शेपूट हालवीत प्रेमाने बाळूच्या अंगाशीं चिकटला.

त्याला पहातांच बाळूचें रडें थांबलें. तो म्हणाला, "वा ! मोत्या, तूंहि रस्ता चुकलास की काय ?"

मोत्याने एकदा ऐटीने गुर्रर्र केलें. जणू काय त्याला म्हणावयाचें होतें की, "वा: ! छोटे धनीसाहेब, मी कधी रस्ता चुकेन का ? मी तर तुम्हांला घरीं परत न्यायला आलों आहे."

बाळू मुकाट्याने कुत्र्याच्या मागोमाग गेला व घरीं पोचला.

इकडे एकदम मुलगा नाहीसा झाला म्हणून त्याला प्रथम शेजारींपाजारीं शोधला. कोठे सापडेना, तेव्हा त्याच्या वडिलांनी पोलिसांत बातमी दिली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पण इतक्यांत मोत्याबरोबर बाळू आला. तेव्हा सर्वांना फार आनंद झाला.

बाळू म्हणाला, "आज मोत्यानें मला घरीं आणलें. किती शहाणा आहे बरें माझा मोत्या !"

प्रश्न

(१) रिकाम्या जागीं योग शब्द लिहा.

जाहिरात, गुरगुर, बातमी.

(१) वडिलांनीं पोलिसांत······दिली

(२) मोत्यानें······पेटीनें······केलें.

(३) मुलें मला······द्या असें ओरडत होतीं.

(२) चुकीचीं वाक्यें खोडा.

(१) बाळूनें दार उघडलें नाहीं.

(२) बाळू खेळ पाहण्यास पुष्कळ दूर गेला.

(३) बाळू मोत्याच्या मागोमाग घरीं गेला नाहीं.

(३) कृतिपर वांचणी—

(१) पेटींत बसा.

(२) बाळू रडूं लागला.

(३) सर्वांना फार आनंद झाला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा बारावा.

गवळी.

(कविता)

(चालः—वसंतीं बघुनि मेनकेला.)



सकाळीं देवाला नमुनी ।
गाइवासरां प्रेमें देतों मी चारा-पाणी ॥ १ ॥
त्या मज बघुनी हंबरती ।
घेति दोरिला ओढ वांसरें, उतावळीं होतीं ॥ २ ॥
घालुनि गाईंना चूण ।
क्षणीं वासरां सोडुनि देतों दूध पिण्या ऊन ॥ ३ ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धरुनी गुडघ्यामधिं चरवी।
रमत एकटा धार काढितों भर भर भर बरवी ॥ ४ ॥
चरव्यांवर चरव्या भरुनी।
कावडींत फेंसाळ दूध तें निघतो घेऊनी ॥ ५ ॥
जातो मग दारोदारीं।
मुलें पाहती वाट दुधाची, वाटी धरुनि करीं ॥ ६ ॥
चरतां गाई मग रानीं।
वाजति घंटा गळ्यांतल्या, त्यांवरि गातों गाणीं ॥ ७ ॥
संध्याकाळीं घरिं येती।
गाई वनिंचा खाउनि चारा, धार पुन: देती ॥ ८ ॥
माझें जिवंत धन गाई।
जपतों त्यांना जिवापरी मी रात्रंदिन पाही ॥ ९ ॥
ज्यांना पाळियलें हरिनें।
त्या गाईंचे वंश राखितों सदैव ममतेने ॥ १० ॥

ना. गं. लिमये

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा तेरावा.

पक्षी.



शिवरामाला पाखरांचा फार नाद. त्यानें एक पोपट, एक मैना व एक दोन कबूतरें पाळलीं होतीं. त्याचा बराच वेळ त्यांच्याशीं खेळण्यांत जात असे. एके दिवशीं त्याचे मित्र गोविंदा व सदाशिव त्याच्या घरीं आले. त्यांना शिवरामानें पक्ष्यांविषयी गमतीची माहिती दिली.

शिवराम—गोविंदा, मला जर पाखरांप्रमाणें पंख असते तर बरें झालें असतें असें वाटतें. या पंखांत काय मऊ मऊ पिसें असतात, पाहिलींस का हीं? हा शेपटीकडचा भाग कसा निमुळता होत गेला आहे?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सदाशिव—काय रे शिवराम, पक्ष्यांना दात असतात का ?

शिवराम—छेः छेः ! त्यांना जी चोच असते तिलाच खूप धार असते. तिने पक्षी फळें वगैरे बारीक कातरून खातात. पण सर्व पक्षी नुसतीं फळेंच खातात असें मात्र नाही. तीं पहा अंगणांतील चिमणी किडेच खात आहे. घार, ससाणा असले दांडगे पक्षी तर लहान लहान पक्षी व प्राणी मारून त्यांचें मास खातात. गिधाडें तर विचारूंच नका. मेलेल्या प्राण्यांचें सारें मास खाऊन टाकतात.

गोविंदा—पण का रे, पक्षी नेहमी झाडावरच राहतात ना ? त्यांचीं पिलें तेथून खाली पडत कशीं नाहीत ?

शिवराम—वाः ! तीच तर गंमत आहे. पक्षी फार शहाणे असतात. ते आपलीं घरटीं झाडांवर बांधतात. हीं घरटीं गवत, पालापाचोळा, काड्या वगैरे एकमेकांत गुंतवून केलेलीं असतात. अंडीं घालण्याची वेळ झाली की, पक्ष्यांची गडबड विचारूं नकोस. घरटीं बनवून त्यांत मऊ मऊ कापूस अगर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पिसें आंतून चिकटवून देतात. हें पाहा मी एक घरटें जपून ठेवलें आहे.

सदाशिव—खरेंच, किती छान आहे हें घरटें! पण अंड्यांतून पिलें बाहेर आलीं म्हणजे खातात काय बरें? त्यांच्या आईचें दूध तर त्यांना मिळत नाही ना?

शिवराम—पक्षी फळांतील मऊ मऊ भाग आपल्या चोचीनें काढून पिलांच्या तोंडांत घालतात. ही मौज पाहाण्यासारखी असते. ल्हान मुलांना जशीं वडील माणसें जेवायला, कपडे घालायला, आंघोळ करायला शिकवितात. तशीच पिलांची आई त्यांना हळूहळू उडण्यास व आपलें खाणें शोधण्याला शिकविते.

गोविंदा—काल मीं तळ्यांत कांही बदकें पोहतांना पाहिलीं. चिमण्यांना येतें का रे असें पोहतां?

शिवराम—नाही. तूं बदकांचे पाय व चिमणी, कावळा यांचे पाय यांतील फरक नाही पाहिलास? चिमणीच्या पायांचीं बोटें सुटीं असतात. बदकांच्या पायांचीं बोटें एका पातळशा कातडीनें एकमेकांस

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जोडलेलीं असतात (मागील चित्र पाहा). यामुळे त्यांना पोहतां येतें. चिमण्यांना येत नाही

मग शिवरामाने आपला पोपट व मैना कसें बोलतात हें दाखविलें. तसेंच त्याने आपलीं कबूतरें मोकळीं सोडलीं व आः आः करून परत बोलावलीं. वर हवेंत मौजेच्या गिरक्या मारून तीं पुन्हा शिवरामाच्या हातावर येऊन बसलीं.

इतक्यांत गोविंदा सदाशिवाला घरचें बोलावणें आलें, त्यामुळे त्यांना जावें लागलें व ही मौज इतकीच राहिली.

प्रश्न

(१) चूक किंवा बरोबर हें सांगा.

(१) बदकाच्या पायांचीं बोटें एका पातळशा कातडीने एकमेकांस जोडलेलीं असतातः—

(२) पक्ष्यांचीं पिलें आपल्या आईचें दूध पितात.—

(२) बरोबर असेल तेथे √ अशी व चूक असेल तेथे × अशी खूण करा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(१) चिमणीच्या पायांचीं बोटें छुटीं नसतात.

(२) पक्षी फळांतील मऊ मऊ भाग आपल्या पिलांच्या तोंडांत घालतात.

(३) बदकांना पोहतां येतें

(३) स्मृति चांचणी—

(१) मांस खाणारे पक्षी .... हे आहेत.

(२) मांस न खाणारे पक्षी .... हे आहेत.

(४) कृतिपर—

खाली दिलेल्या पक्ष्यांचीं चित्रें काढा व त्यांना रंग भरा.

पोपट, मैना, बदक, कबूतर, घार, गिधाड, चिमणी व कावळा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा चौदावा.

बाळूची सर्कस.

बाळू एकदा सर्कस पाहावयास गेला. तेथे घोडे, हत्ती, वानर, कुत्रे व पोपट यांचीं कामें पाहून त्याला फार मौज वाटली. हत्ती एका छोटयाशा टेबलावर उभा राहिला. वानर त्याच्या मानेवर बसून माहुता-सारखा त्याला बर्चीने टोचूं लागला. कुत्रें एक गाडी ओढीत होतें व वानर ती गाडी हाकीत होता. पोपटाने सायकल चालविली.

माणसांची कसरतहि फार मौजेची होती. टेबलावर खुर्ची; तिच्यावर एक माणूस उभा राहिला व त्याच्या दोन खांद्यांवर दोन मुलें एका पायावर उभीं राहिलीं. मग एका माणसाने तारेवरून चालून दाखविलें.

अशा किती तरी गमती पाहून बाळूला वाटलें, आपणसुद्धा आपल्या घरीं एक लहानशी सर्कस करावी.

त्याने आपला कुत्रा टिप्या व दोन मांजरें घेऊन बाबांच्या खोलींत सर्कस सुरू केली. शेजारच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दामूला व रामूला त्याने मदतीस बोलावलें. त्याची धाकटी बहीण सुंदरी व शेजारचीं आणखी एक दोन मुलेंहि सर्कस पहावयास आलीं.

बाळू व त्याचे सोबती यांनी बाबांच्या टेबलावर त्यांची खुर्ची ठेवली व त्या खुर्चीवर बाळू चढला व त्यावर त्याने टिप्या कुत्र्यास बोलावलें. कुत्रा टुणकन उडी मारून वर चढला. त्या वेळीं त्याचा धक्का लागून टेबलावरील दिवा खाली पडला, त्याची काच फुटली व तेल बैठकीवर सांडलें. "अगबाई, हें काय झालें !" सुंदरी व मुलें ओरडलीं. बाळूहि घाबरला व तोल जाऊन खुर्चीसुद्धा खाली पडला ! टेबलावरील दौत लवंडून शाई सांडली व पुस्तकें खराब झालीं. बाळूचें डोकें जोराने आपटलें होतें; त्यामुळे तो मोठ्याने रडूं लागला.

त्याचें रडें ऐकून आई धावत आली व इतक्यांत बाबाहि बाहेरून आले !

"काय झालें रे हें बाळू ?" बाबांनी विचारलें. पण बाळू कांहींच बोलेना. तो अगदी लाजला होता.

सुंदरी म्हणाली, "बाळू सर्कस करीत होता !"
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बाबा हसले व म्हणाले, "पाहिलेंत मुलांनो, भलतेंच काम केलें म्हणजे कशी फजिती होते ती?"

प्रश्न

(१) चुकीचे शब्द बरोबर लिहा.

सरकस, खुरची, कुत्रास, साई.

(२) कारण सांगा.

(१) बाळूचें डोकें जोराने आपटलें होतें. कारण······

(२) टेबलावरील दिवा खाली पडला. कारण······

(३) रिकाम्या जागीं शब्द लिहा.

(१) "पाहिलेंत × × × भलतेंच × × केलें म्हणजे कशी × × × होते ती."

(२) "सुंदरी व × × ओरडली. बाळूहि × × × × व × × जाऊन खुर्ची × × खाली पडला."

(४) समानार्थी शब्द सांगा.

तोल—	लवंडून—
धाकटी—	बैठक—

(५) कृतिपर—

हत्ती, कुत्रा, वानर, मांजर यांचीं चित्रें काढा.

(६) कुत्रा, वानर, मांजर हीं कशीं ओरडतात ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

माझें जेवण

आज गंगाधरपंतांच्या येथे दिनूचा वाढदिवस असल्यामुळे दिनूच्या मित्रांना जेवावयास बोलाविलें होतें. मुलें हसत हसत सावकाशपणें जेवत होतीं. त्यांना पाहून दिनूची आई म्हणाली, "बाळांनो, चला लवकर जेवणें आटोपा. केव्हाचें जेवावयाला बसला आहांत. हा आमचा दिनू पाहा ना. आज कसा अगदी सावकाश व आनंदांत जेवत आहे. रोज तो घाईघाईने सर्वांच्या आधीं जेवून उठतो व याबद्दल तो आपल्या भावंडांजवळ लवकर जेवून उठल्याबद्दल ऐट मारतो. परंतु आज तर त्याचें जेवण अगदी सावकाश चाललें आहे."

आईचें बोलणें ऐकून दिनू म्हणाला, "आई, काल आमच्या शाळेंत मुंबईचे देशमुख डॉक्टर आले होते. त्यांनी जेवावें कसें याबद्दल बरीच माहिती सांगितली. त्याप्रमाणे आम्हीं आजपासून वागण्याचें ठरविलें आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आई म्हणाली, "डॉक्टरांनी काय माहिती सांगितली, ती आम्हांला सांग तरी."

जेवून उठल्यावर दिनू आईला म्हणाला, "आई, डॉक्टर म्हणाले की, जेवतांना घाई करूं नये. अन्न न चावतां गिळलें तर पोटांतील आंतड्यांना फार त्रास होतो. याकरितां प्रत्येक घास चांगला चावून खावा. त्यांत लाळ मिसळली पाहिजे. म्हणजे अन्न चांगलें पचतें. जेवतांना अमका पदार्थ वाईट, तो मला आवडत नाही, म्हणून तोंड वेडेंवाकडें करूं नये. आनंदाने जेवावें. तसेंच एखादा पदार्थ आवडला म्हणून तो उगाच खात सुटूं नये. रात्रीच्या जेवणाला तर भुकेपेक्षा चार दोन घास अन्न कमी खावें. त्याच त्याच प्रकारचें अन्न खाल्लें म्हणजे थोडा कंटाळा येतो. म्हणून थोडे वेगवेगळे प्रकार असतील तर चांगले. पण फार जड मसालेदार पदार्थ, मिठाई हीं फार खाऊं नयेत. भाज्या, फळें वगैरे मात्र जरूर खावीं."

आई म्हणाली, "शाबास दिनू! खराच उत्तम आहे हा उपदेश. असें जेवण्याने कधीहि कोणी आजारी पडणार नाही."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रश्न

(१) खरें किंवा खोटें हें सांगा.

(१) दिनू अगदी सावकाश व आनंदांत जेवत होता.……

(२) रात्रीच्या जेवणाला भुकेपेक्षा चार दोन घास अन्न जास्त खावें.……

(२) कारण सांगा.

(१) जेवतांना घाई करूं नये. कारण……

(२) एखादा पदार्थ आवडला तर तो उगीच खात सुटूं नये. कारण………

(३) पुढील वाक्यें पुरीं करा.

(१) फार जड मसालेदार पदार्थ, मिठाई………

(२) त्याच त्याच प्रकारचें अन्न…………… कंटाळा येतो.

(४) स्मृति चांचणी—

(१) डॉक्टरांनी कोणती माहिती सांगितली?

(२) जड मसालेदार पदार्थ फार कां खाऊं नयेत?

(३) घाई घाईने जेवल्याने काय होतें?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा सोळावा.

गावठी उंदीर व शहरचा उंदीर.

खेड्यांत राहाणाऱ्या एका उंदराचा एक मित्र शहरचा उंदीर होता. त्याने आपल्या मित्रास खेड्यांत पाहुणचारास बोलाविलें. त्याप्रमाणे तो आला. तेव्हा त्याने चांगलीं फळें, मुळें, धान्य वगैरे पदार्थ पाहुण्यापुढे ठेवले. हा पाहुणचार शहरच्या उंदरास फारसा आवडला नाही. पण खेडवळ उंदीर ते पदार्थ सपाटून खात बसला.

भोजन चाललें असतां शहरी उंदीर खेडवळ उंदरास

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म्हणतो, "मित्रा, तुला येथे कसें बरें वाटतें ? चल माझ्या घरीं, म्हणजे तुला शहरांतली मौज दाखवीन." याप्रमाणे ते दोघे त्या मित्राचे घरीं आले.

तें घर एका श्रीमंत गृहस्थाचें होतें. त्याच्या घरीं मेजवानी होती स्वयंपाकघरांत गोड गोड अन्नाचीं ताटें भरलीं होतीं. शहरी उंदीर म्हणाला, "पाहिलेंस येथे कशी चैन आहे ती ! चला आपण ते खूप पोटभर खाऊं."

दोघे उंदीर तेथे गेले. ताटांतील पदार्थ खाऊं लागले, इतक्यांत वाढणारी मंडळी आली व त्यांतील बरेच पदार्थ बाहेर घेऊन गेली. त्यांना पाहातांच त्या उंदरांनी पळ काढला.

तीं माणसें निघून जातांच दोघे पुन्हा आले. त्यांनी खाण्यास सुरुवात केली तोंच आणखी माणसें आलीं. उंदीर पुन्हा पळाले !

थोड्या वेळाने ते परत आले व कांही खाऊं लागले. इतक्यांत दोन लठ्ठ मांजरें तेथे आलीं. मग तर उंदरांना पळतां पळतां पुरेवाट झाली.

खेडवळ उंदीर म्हणाला, "का हो शहरवाले, तुमच्या येथे नेहमी अशीच गडबड असते का ?"

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शहरी उंदीरः—होय. तसा प्रकार आहे खरा थोडा. पण चांगलें खावयास त्याशिवाय कसें मिळणार ?

खेडवळ उंदीरः— असें असेल तर मला तें तुमचें गोड गोड अन्नाचें जेवण नको ! माझी खेड्यांतील ज्वारी बाजरीच बरी. तिच्याकरितां मला आपला जीव वारंवार धोक्यांत तरी घालावा लागत नाही !

प्रश्न

(१) होय किंवा नाही हें सांगा.

(१) खेडवळ उंदराच्या घरचा पाहुणचार शहरच्या उंदरास आवडला काय ?......

(२) शहरांतल्या उंदराच्या घरचा पाहुणचार खेडवळ उंदरास आवडला ?.........

(२) रिकाम्या जागीं योग्य शब्द लिहा.

(१) मला आपला जीव......धोक्यांत घालावा लागत नाहीं. (एकदां, चारदां, वारंवार)

(२) तुमच्या येथें........अशीच......असते का ? (दररोज, नेहमीं, मौज, गडबड, फजिती)

(३) चुकीचे शब्द बरोबर लिहा.

शीरीमंत, ग्रुहस्थ, सैपाक.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा सतरावा.

धानाची लावणी.



जगन्नाथ दिवाळीच्या सुटींत भंडाऱ्याला आपल्या मामाचे घरीं आला होता. तो पहिल्यानेच या भागांत आला होता. तो एके दिवशीं मामाबरोबर फिरावयास गेला असतां, चोहोकडे त्याला धानाचीं लहान लहान चौकोनी शेतें दिसलीं. तीं पाहून तो मामास म्हणाला, "मामा, हीं लहान लहान चौकोनी शेतें कशाचीं ?"

मामा—हीं धानाचीं शेतें आहेत. तुझ्या गावाकडे धानाचें पीक होत नाहीं. त्यामुळे अशीं लहान लहान शेतें नाहींत. धानाचीं रोपें तयार करून मग

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांची लावणी करावी लागते. आता थोड्याच दिवसांत रोपांची लावणी सुरू होईल, त्यावेळीं आपण मौज पाहूं. प्रथम हीं लहान शेतें नांगरून ठेवलेलीं असतात. पावसाची झड लागली म्हणजे तीं पुन्हा नांगराने नांगरून टाकतात. त्यामुळे शेतांत चांगला चिखल होतो. मग या चिखलांत पावसाळ्याचे पूर्वींच बीं टाकून तयार केलेलीं रोपें लावतात. हीं रोपें एका ठिकाणीं सहा सात अशीं लावतात. लावणी पावसाचे दिवसांतच होत असते. म्हणून कामकरी लोक डोक्यावर इरलीं घेतात.

जगन्नाथ—खरोखर मौज आहे या धानाच्या लावणाची; आता किती दिवसांनी धान तयार होईल ?

मामा—धानाचें पीक तयार होण्याला लावणीपासून सुमारें चार महिने लागतात. शेतें पिकून तयार झालीं, म्हणजे तीं पिवळीं दिसूं लागतील. मग त्यांची कापणी होईल. मग धानापासून तांदूळ काढतील.

प्रश्न

(१) कृतिपर चांचणी—

(१) इरलें काढा (चित्र)

(२) धानाचीं रोपें काढा व त्यांना रंग भरा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(२) चुकीचीं वाक्यें खोडून काढा.

(१) धानाचीं शेतें पिकून पिवळीं होतात.

(२) धानापासून गहू काढतात.

(३) तांदळापासून पोहे करतात.

(३) चूक किंवा बरोबर हें लिहा.

(१) जगन्नाथ दिवाळीच्या सुटींत मावशीच्या घरीं आला होता............

(२) धानाचीं रोपें चिखलांत लावतात............

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा अठरावा.

माझी बाहुली.

(कविता)

नाना, बाहुली माझी। बघा कोनाड्यामाजी।
तिला परांची गादी। तिची रेशमी साडी।
तिला जरीचा कांठ। बघा राणीचा थाट।
शोभे श्रीमंती हिला। रंग महालीं निळा।
नाही चढेल हट्टी। हिची कोणाशी गट्टी ?॥ १ ॥
तोंड पाहून लाजे। फूल गुलाबी ताजें।
दांत कुंदाच्या कळ्या। गालीं सुंदर खळ्या।
काळे टपोर डोळे। भारी लाडिक डोळे।
नाक चांफ्याची कळी। ओठ दोन पोवळीं।
शब्द दिसती ओठीं। पण अबोल मोठी॥ २ ॥
ठेवा एकटी घरीं। धीट आनंदी परी।
थो थो काजळ घाला। नाही पाणी डोळ्याला।
निजे पुढ्यांत माझ्या। कधी वाजेना बाजा।
पोर गुणाची खाणी। व्हावी कुणाची राणी ?
पण अजून बाई। मोठी कां होत नाही ?॥ ३ ॥

माधव ज्युलियन.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा एकोणिसावा.

आंधळे व हत्ती.



सहा आंधळे होते. त्यांना हत्ती कसा असतो हें माहीत नव्हतें. तेव्हा ते सर्व एका हत्तीला हाताने चाचपून पाहूं लागले.

पहिल्या आंधळ्याच्या हाताला हत्तीच्या पोटाची बाजू लागली. तो म्हणाला, "हं, समजलें मला. हत्ती भिंतीसारखा असतो.

दुसऱ्याच्या हातीं सोंडच लागली. तो म्हणाला,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

"वाः ! हत्ती तर सापासारखाच असतो."

तिसऱ्याच्या हातीं हत्तीचा एक सुळाच लागला होता. तो म्हणाला, "अहाहा, किती वाटोळा, गुळगुळीत व अणकुचीदार हत्ती असतो ? अगदी भाल्यासारखा."

चवथ्याने हत्तीचा पायच धरला होता. त्यावरून तो म्हणाला, "छे, हत्ती हुबेहूब खांबासारखा सरळ असतो !"

पांचव्या आंधळ्याने हत्तीचा एक कान पकडला होता. तो म्हणाला, "हत्ती सुपासारखा असतो."

सहावा बिचारा सर्वांत शेवटास होता. त्याचे हातीं हत्तीचें शेपूटच लागलें. तो हसून म्हणाला, "तुम्हांपैकी कोणालाच समजलें नाही. हत्ती हा गोंडेदार दोरीसारखा आहे."

भोवताली जमलेल्या लोकांना हें पाहून फार मौज वाटली. पण त्यांना आंधळ्यांची दयाहि आली.

मग हत्तीच्या माहुताने त्यांना हत्ती कसा असतो हें समजावून दिलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रश्न

(१) बरोबर असेल तेथें √ अशी व चूक असेल तेथे × अशी खूण करा.

(१) हत्ती तर सापासारखाच असतो.

(२) हत्ती हुबेहूब खांबासारखा असतो.

(२) उलट अर्थाचे शब्द लिहा.

दया—	काळा—
सरळ—	पकडला—

(३) कृतिपर वांचणी :—चित्रें काढा:—

दोरी, साप, हत्ती, भाला, सूप.

(४) खालील शब्दांचा वाक्यांत उपयोग करा.

माहूत, आंधळे, खांब, गोंडेदार.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मीठ.

एके दिवशीं गोविंदा जेवावयास बसला होता त्याने वरण थोडें तोंडांत घालून पाहिलें व लगेच तोंड कसेंसें केलें! "हें काय आई? आजचें वरण मला नाही आवडत!"

बाबांनी वरण चाखून पाहिलें व ते म्हणाले, "अरे यांत मीठ घालण्याचें राहिलें आहे. त्यामुळे तें अळणी लागत आहे. पहा बरें थोडेंसें मीठ लावून त्याला."

गोविंदा—बाबा! आता छान लागतें हें!

बाबा—अरे, मीठ हा आपल्या खाण्यांतील फार जरूरीचा पदार्थ आहे. त्यावांचून आपलें फार अडतें. साखर, गूळ यांसारखे गोड पदार्थ नसले तरी चालेल, पण मिठाशिवाय चालणार नाही. आमटी भाजी, कोशिंबिरी या सर्वांत मीठ नसलें तर तीं अगदीं बेचव लागतील. माणसांप्रमाणेच जनावरांना देखील मिठाची जरूरी आहे. म्हणून गुरांनाहि मीठ देतात. मिठाने रक्त शुद्ध होऊन प्रकृति चांगली राहते. म्हणून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

श्रीमंतांपासून गरिबांपर्यंत सर्वांना मिठाचा उपयोग आहे. मिठाचे कांही उपयोग तुला ठाऊक आहेत काय?

गोविंदा—होय. परवाच आमच्या मास्तरांनी सांगितलें की, पदार्थ नासूं नयेत म्हणून त्यांत मीठ घालतात. तसेंच मास, मासे वगैरे पदार्थ कुजूं नयेत व पुष्कळ दिवस टिकावे म्हणून त्यांत मीठ घालतात.

बाबा—बरोबर! पण हा उपयोगी पदार्थ कसा मिळतो?

गोविंदा—समुद्राचें पाणी खारें असतें व त्यांतूनच मीठ काढतात असें मीं ऐकलें आहे. पण तें कसें काढतात हो?

बाबा—समुद्राच्या कांठी वाफे तयार करतात. भरतीच्या वेळीं पाणी आंत आलें म्हणजे हे वाफे पाण्याने भरतात. मग उन्हाने पाणी आटून गेलें, म्हणजे जमिनीवर मिठाचे बारीक बारीक खडे चमकूं लागतात. ते लाकडी पावड्यांनी गोळा करतात. अशा मिठाच्या कारखान्यास 'मिठागर' म्हणतात. कोंकणांत समुद्रकिनाऱ्यावर पुष्कळ मिठागरें आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

याशिवाय मीठ खाणींतून खणूनहि काढतात. बाजारांत सैंधव मीठ किंवा सेंदेलोण म्हणून मिळतें तें असें खाणींतून काढलें असतें. हें फार स्वच्छ असून औषधाला देखील उपयोगी पडतें. आपल्या देशांत पंजाबाकडे याच्या खाणी आहेत.

प्रश्न

(१) खरें किंवा खोटें हें लिहा.

(१) मिठाचा उपयोग फक्त गरिबांनाच होतो...

(२) जनावरांना देखील मिठाची जरूरी आहे......

(२) होय किंवा नाही हें सांगा.

(१) मीठ खारट असतें ?.........

(२) मीठ खाणींतून खणून काढतात ?.........

(३) रिकाम्या जागीं योग्य शब्द लिहा.

(१) समुद्राचें पाणी......असतें.

(२) मिठाचे बारीक बारीक खडे.........लागतात.

(३) मिठाच्या कारखान्यास...........म्हणतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा एकविसावा.

दरबार-दिन.

पवनारच्या शाळेस दरबार-दिनासाठीं सुटी होती. शाळा निशाणें व झेंडे लावून सजविली होती. दुपारीं सर्व मुलें शाळेंत जमलीं होतीं. मुलांनी सणावारीचे पोशाक घातले होते. गावांतील पाटील, पटवारी व चार चांगले लोक यांनाहि बोलाविले होतें. तेहि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

येऊन बसले होते. सम्राट पंचम जॉर्ज यांची मोठी तसबीर उंच जागीं टांगलेली होती! ती फुलांच्या माळा घालून सजविली होती.

शाळेच्या कमिटीचे अध्यक्ष भगवंतराव देशमुख आल्याबरोबर सर्वांनी उभे राहून त्यांचा सत्कार केला. मग हेडमास्तरांनी पुढील भाषण केलें.

"मुलांनो, आज तुम्हांला सुटी कशासाठी दिली आहे व ही सभा कां बोलावली आहे हें मी थोडक्यांत सांगतों. आपले भाग्यशाली बादशहा पांचवे जॉर्ज इ. स. १९११ सालीं ब्रिटिश साम्राज्याचे राजे झाले. त्यानंतर त्यांनी महाराणी मेरी यांचेसह आपल्या हिंदुस्थानास भेट दिली व तारीख १२ डिसेंबर १९११ रोजीं दिल्ली येथे मोठा दरबार भरवून आपण हिंदुस्थानचे बादशहा झालों असें जाहीर केलें.

खुद्द बादशहा हिंदुस्थानांत येण्याचा हा पहिलाच प्रसंग. या दरबाराला हिंदुस्थानांतील सर्व मुख्य मुख्य राजेरजवाडे, बडे बडे अधिकारी हजर होते. हा समारंभ दिल्ली येथे झाला व त्या वेळीं दिल्ली

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ही हिंदुस्थानची राजधानी करण्यांत आली. याच दिवशीं हिंदुस्थानांतील सर्व मुख्य मुख्य ठिकाणींहि दरबार व जाहीर सभा झाल्या व राजा राणी यांस दीर्घायु व आरोग्य चिंतण्यांत आलें.

त्यानंतर प्रत्येक वर्षीं हा १२ डिसेंबरचा दिवस सर्व ठिकाणीं दरबार-दिन म्हणून पाळण्यांत येतो.

आपणहि आज त्याच कामासाठीं जमलों आहों. ईश्वराने महाराज पंचम जॉर्ज व महाराणी मेरी यांना पुष्कळ दिवस पर्यंत सुखी ठेवावें व त्यांच्या कृपेने. आपल्या देशास स्वातंत्र्य व सुख हीं मिळावीं अशी आपण मनापासून ईश्वराची प्रार्थना करूं या."

नंतर मुलांनी राजगीत व राष्ट्रगीत हीं म्हटलीं व "पंचम जॉर्ज बादशहाचा विजय असो" असा एकच जोराने आवाज केला.

मग मुलांचे खेळ वगैरे झाले. अध्यक्षांनी पहिल्या नंबराच्या खेळाडूंस बक्षिसें वाटलीं. पाहुण्यामंडळीस पानसुपारी व मुलांस मिठाई दिली मग हा समारंभ आटोपला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रश्न

(१) खरें किंवा खोटें हें लिहा.

(१) अध्यक्ष आल्याबरोबर सर्वांनी त्यांचा सत्कार केला...........

(२) शाळा निशाणें व झेंडे लावून सजविली नव्हती...............

(२) समानार्थी शब्द सांगा.

दीर्घायु—	स्वातंत्र्य—
प्रार्थना—	भाग्यशाली—

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा बाविसावा.

झाडें.



अहमदभाई एके दिवशीं हसनला बरोबर घेऊन बगीच्यांत गेले. तऱ्हेतऱ्हेचीं झाडें, वेली व फूलें, फळें पाहून हसन अगदी खूष होऊन गेला.

अहमदभाई—हसन, हीं झाडें तूं पाहिलींस. सांग पाहूं आता झाडांत काय काय असतें तें ?

हसन—झाडावर पानें, फुलें, फळें असतात.

अहमदभाई—ठीक आहे. पण पानें कशावर असतात ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हसन—डाहाळ्यांवर. यांना फांद्या असेंहि म्हणतात ना ?

अहमदभाई—होय. पण फांद्या ज्यामधून फुटतात त्या मधल्या खांबासारख्या भागाला काय म्हणतात ?

हसन—मला नाही माहीत.

अहमदभाई—त्याला झाडाचें खोड म्हणतात. जीं झाडें उभीं राहूं शकत नाहीत; तीं जमिनीवर अगर दुसऱ्या झाडांवर पसरतात. त्यांस वेल म्हणतात. पण हे जमिनीवर दिसणारे भाग झाले. आता हें पहा मी एक छोटेंसें झेंडूचें रोपटें जमिनींतून उपटून काढतों. हें पहा खाली काय दिसत आहे ?



मुळांचे प्रकार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हसन—यांना तर मुळें म्हणतात !

अहमदभाई—बरोबर. मुळांचा झाडांना काय उपयोग होतो हें मी तुला सांगतों, ऐक.

प्रत्येक झाडाला मुळें असतात. मुख्य मुळें जाड असून तीं जमिनींतखूप खोल गेलेलीं असतात; त्याच्या बाजूला लहान लहान मुळ्या असतात. मुळ्यांना बारीक दोऱ्यासारखीं पाळें फुटतात. हीं सर्व जमिनींत पसरून तिला घट्ट धरून राहातात व वाढतात. म्हणून तर झाड उभें राहूं शकतें.

झाडांना पावसाचें किंवा विहिरीचें पाणी मिळालें तरच तीं जगतात. नाही तर सुकून जातात, हें तूं पाहिलेंच. पाणी व जमिनींतील क्षार हें झाडांचें अन्न होय. हें मुळें शोषून घेतात. म्हणजे मुळें हीं झाडांचीं तोंडें होत. आपलें तोंड वर असतें तर झाडांचें खालीं असतें.

बीं लावलें म्हणजे त्याला अंकुर फुटून रोपा उगवतो. रोपा वाढून त्याचें झाड अथवा वृक्ष बनतो. गुलाब, झेंडू यांचे फार मोठे वृक्ष होत नाहीत. रोपेच राहातात; पण आंबा चिंच वड यांचे मोठे वृक्ष बनतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अशा वृक्षांची सावली दाट पडते व उन्हाच्या वेळीं तिच्याखाली बसलें, तर आराम वाटतो. अशा वृक्षांपासून आपणास लाकूड मिळतें. लाकूड घरें बांधण्यास व पाट, झोपाळे, खुर्च्या, पलंग वगैरे सामान करण्यास उपयोगी पडतें. लाकडाचा उपयोग जाळण्याकडेहि होतोच.

आपणास झाडांपासूनच धान्यें व फळें मिळतात, हें तुला माहीतच आहे.

उशीर झाल्यामुळे अहमदभाई घराकडे परतले व हें भाषण येथेच थांबलें.

प्रश्न

(१) योग्य शब्दांची निवड करा.

(१) आंबा, वड यांचे मोठे........असतात. (वेल, वृक्ष, पान)

(२) झाडाचीं मुळें आपलें अन्न...........घेतात. (चावून, शोषून, धरून)

(२) स्मृति चांचणी--

(१) लाकडाचा उपयोग सांगा.

(२) वेल व झाड यांच्यांत काय फरक आहे ?

(३) खरें किंवा खोटें हें लिहा.

(१) झाडाचें तोंड जमिनीच्यावर असतें........

(२) वेलाचें खोड मजबूत असतें........

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा तेविसावा.

बकासुराची गोष्ट.

पांडव जंगलांत राहात असतांना फिरत फिरत एका गावांत आले व एका गरीब ब्राह्मणाच्या घरीं राहिले. या गावाजवळच्या जंगलांत बकासुर नांवाचा एक मोठा राक्षस राहात होता. तो त्या गावांतील लोकांकडून दररोज एक गाडाभर अन्न, दोन रेडे व एक मनुष्य इतकें खाण्याकरितां घेत असे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्या राक्षसाचें इतकें खाणें त्या गावांतील सर्व कुटुंबांना आळीपाळीने द्यावें लागे. एकदा ही पाळी एका ब्राह्मणाच्या कुटुंबावर आली. तेव्हा त्या घरांतील माणसें रडून दुःख करूं लागलीं. त्यांचें रडणें ऐकून पांडवांस दया आली. त्यांच्यापैकी भीम फार दांडगा होता, त्याने राक्षसाची खोड मोडण्याचें ठरविलें. भीमाने ब्राह्मणाकडून गाडाभर अन्न व दोन रेडे तयार केले. भीम त्या गाड्यावर बसून राक्षसाकडे गेला.

भीमाने गाड्याचे रेडे सोडून हांकून लावले व आणलेलें अन्न खाण्याचा सपाटा चालवला. हें पाहून तो राक्षस रागावला व भीमास म्हणाला, "अरे, माझे रेडे कोठे आहेत व माझें अन्न खाणारा तूं कोण ?"

भीमाने त्यास उत्तर दिलें नाही. त्यामुळे बकासुर आणखी खूपच रागावला व त्याला बुक्क्यांनी मारूं लागला. तेव्हा भीम राक्षसास म्हणतो, "हं, चालूं दे थोडा वेळ असेंच. माझें अंग चांगलें रगडतें आहे. जेवण संपलें की घेतोंच तुझा समाचार."

भीमाचें जेवण संपतांच तो उठला व राक्षसास म्हणाला, "चल ये आता ! पाहूं दे तुझी ताकद !"

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नंतर त्या दोघांची कुस्ती झाली. शेवटी भीमाने बकासुरास ठार केलें.

अशा रीतीने त्या ब्राह्मणावरचें व सर्व गावावरचें संकट टळलें.

प्रश्न

(१) चूक किंवा बरोबर हें लिहा.

(१) बकासुरास एक गाडाभर अन्न, दोन रेडे व एक मनुष्य इतकें खाण्यासाठीं लागत नसे...

(२) समानार्थी शब्द लिहा.

सपाटा—	संकट—
समाचार—	ठार केलें—

(३) स्मृति चांचणी—

(१) पांडवांचीं नांवें सांगा.

(२) बकासुर गावकऱ्यांना कसा त्रास देत असे ?

(४) चुकीचे शब्द बरोबर लिहा.

बाम्हण, अंन्न, भुकयांनीं, तरास.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा चोविसावा.

गुलाब-कळी.



गुलाबकळी । ही फुलली । उपवन देवी जणुं हंसली ॥
आंदोलीं । जणुं बसली । झोके घेऊनि ही दमली ।
श्वास कसे । टाकितसे । परिमळ त्यांचा काय असे ?॥
रंग असा । मोहकसा । काय देइ तुज रम्य उषा ?॥
जरि काटे । तुज असले । गुणसमूहिं लव दोष खुले ॥
दंवबिंदू । तव कंठीं । शुभ्र मौक्तिकांसम दिसती ॥
मोहकता । कोमलता । हे गुण देई तुज धाता ! ॥
जन्मावें । जरि दैवें । तुझ्याच पोटीं मी यावें ॥

यशोदासुत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा पंचविसावा.

छोटें रामायण.

भाग १ ला.



पूर्वी अयोध्येंत दशरथ राजा राज्य करीत होता. त्याला तीन बायका होत्या. पहिलीचें नांव कौसल्या इच्या पोटीं रामचंद्राचा जन्म झाला.

दुसरी कैकेयी. इला भरत झाला. तिसरी सुमित्रा. तिला लक्ष्मण व शत्रुघ्न असे दोन पुत्र झाले.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राम व लक्ष्मण हे लहान होते. तेव्हाच त्यांना विश्वामित्र ऋषींनी आपल्या आश्रमांत नेले. तेथे रामचंद्राने मोठा पराक्रम करून राक्षसांना मारलें व विश्वामित्राचा यज्ञ पूर्ण होऊं दिला. तेव्हा विश्वामित्र खूष झाले. त्यांनी रामचंद्रास लढाईची पुष्कळ चांगली विद्या शिकविली.

पुढे लवकरच जनक राजाची मुलगी सीता हिच्याशी रामचंद्राचें लग्न मोठ्या थाटाने झालें.

दशरथ राजा म्हातारा झाला, तेव्हा त्यास वाटलें की, रामास गादीवर बसवावें, पण कैकेयीस हें आवडलें नाही. तिला वाटलें भरतास गादी मिळावी. तिने एके वेळीं दशरथाचें मोठें काम केलें होतें तेव्हा दशरथाने कबूल केलें होतें की, "तूं मागशील त्या दोन गोष्टी मी तुला देईन." कैकेयीने या वेळीं त्या दोन गोष्टी मागितल्या. पहिली गोष्ट भरताला गादीवर बसवा. दुसरी गोष्ट रामाला चौदा वर्षें वनांत पाठवा.

दशरथाने कैकेयीची पुष्कळ समजूत केली. पण तिने आपला हट्ट सोडला नाही.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राम म्हणाला, "मी खुषीने वनांत जातों. भरताला गादीवर बसूं द्या."

मग राम, सीता व लक्ष्मण तिघेंजण वनांत गेलीं. इकडे राजा दशरथ दुःख करीत मरण पावला !

भरत यावेळीं अयोध्येंत नव्हता. तो आल्यावर त्यास ही हकीकत समजली. त्याला आईचा फार राग आला, तो वनांत जाऊन रामाला म्हणाला, "रामा, मला गादी नको; तूं परत चल व राज्य कर." राम म्हणाला, "भरता, आपण पित्याचें वचन पाळलें पाहिजे." मग भरत परत गेला; पण राम येईपर्यंत तो शहराबाहेरच राहिला.

प्रश्न

(१) चूक किंवा बरोबर हें लिहा.

(१) कैकेयीने आपला हट्ट सोडला.........

(२) रामचंद्राने राक्षसांना मारलें...........

(२) स्मृति चांचणी—

(१) दशरथाच्या राण्यांचीं नांवें सांगा.

(२) रामचंद्राची कथा सांगा.

(२) भरताने गादी कां घेतली नाही ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा सव्विसावा.

छोटें रामायण.

भाग २ रा.

राम, सीता व लक्ष्मण वनांत सुखानें राहात होतीं. पण लंकेचा राजा रावण याच्या मनांत वाईट बुद्धि आली. राम लक्ष्मण बाहेर गेले असतां त्यानें सीतेस उचलून लंकेंत नेलें व एका बगीच्यांत ठेवलें.

राम, लक्ष्मण परत आले व पहातात तों सीता झोपडींत नाही. रामास फार दुःख झालें. तो इकडे तिंकडे भटकून सीतेस शोधूं लागला. वाटेंत त्याला सुग्रीव व मारुति असे दोन वानर भेटले. मारुतीने सीतेचा शोध लावला व लंकेंत जाऊन सीतेची भेट घेतली. "रामचंद्र लवकरच येईल व तुझी सुटका करील" असे मारुतीचे शब्द ऐकतांच सीतेस धीर आला.

मारुतीने रावणास सीतेस सोडून दे असें सांगितलें. पण रावण माजला होता. तो ऐकेना.

शेवटी रामचंद्र वानरांची मोठी सेना घेऊन लंकेवर चालून गेला. रावण व त्याचे सर्व राक्षस यांना

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मारून रामाने सीतेस सोडविलें.

मग राम मोठ्या समारंभाने अयोध्येस परत आला. भरत, कौसल्या वगैरेस फार आनंद झाला. रामचंद्राने पुष्कळ वर्षेपर्यंत अयोध्येंत सुखाने राज्य केलें.

प्रश्न

(१) होय किंवा नाही हें सांगा.

(१) राम, सीता व लक्ष्मण वनांत सुखाने राहात होतीं ? ......

(२) रामचंद्राने अयोध्येंत दुःखाने राज्य केलें ?..

(२) स्मृति चांचणी—

(१) रावणाने कोणती वाईट गोष्ट केली ?

(२) रामचंद्राला कोणी मदत केली ?

(३) मारुतीने सीतेला काय सांगितलें ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा सत्ताविसावा.

वारा.

मुलांनो, तुम्हीं कधी पतंग उडविला आहे का ? कशाने बरें उडतो तो ? वाऱ्याने.

पण वारा म्हणजे काय ? आपल्या भोवताली जिकडेतिकडे हवा आहे. आपण श्वास घेतों व सोडतों तेव्हा हवाच घेतों व सोडतों. हवेशिवाय आपण जगणार नाही. पण हवा आपणास दिसत नाही. शांत असली म्हणजे ती आहे असें वाटत नाही पण ती हलूं लागली म्हणजे मात्र समजते. मग तिला आपण वारा म्हणतों.

आपणाला वारा दिसत नाही. पण वाऱ्याने केलेलें काम मात्र दिसतें. वाऱ्याने झाडांचीं पानें हालतांना दिसतात. टेबलावरील कागद उडून गेलेले दिसतात. वाऱ्याने उडविलेली धूळहि दिसते.

उन्हाळ्यांत वारे गरम असतात ; हिवाळ्यात ते थंडगार असतात.

वारा फार महत्त्वाचीं कामें करतो.

तुम्हांला त्यांतील कांही सांगतां येतील ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१ वारा पाऊस आणतो. पावसाचे ढग तयार झाले, म्हणजे वारा त्यांना आपल्याकडे आणतो. पावसाळ्यांत पुष्कळ वेळा पाऊस पडूं लागण्यापूर्वी जोराचा वारा सुटतो. वारा हवेंत थंडावा आणतो. उन्हाळ्यारात्रीं वारा सुटला म्हणजे किती आराम वाटतो बरें!

२ वाऱ्याने चक्की चालते. तिला 'पवनचक्की' म्हणतात. आपल्या इकडे कोठेंकोठें अशा पवनचक्कीने विहिरींतून पाणी वर काढण्याचे पंप चालतात. कोठें दळण्याचें किंवा इतर कामहि होतें.

३ वाऱ्याने होड्या व जहाजें चालविलीं जातात. शीड अथवा अवजार नावेला बांधलें व त्यांत वारा भरला म्हणजे ती जलद चालते. पूर्वी आगबोटी नव्हत्या तेव्हा नावा व जहाजे अशींच चालत. वारा बंद पडला तर जहाजहि थांबे.

४ पण वारा नेहमीच आपल्यावर उपकार करीत नाही. तो रागावला म्हणजे फार भयंकर! मग त्याला आपण 'वादळ' म्हणतों. वादळाने मोठमोठीं झाडें मोडून पडतात, घरांवरील कौले, पत्रे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वगैरे उडून जातात; तारायंत्राचे खांब उलथून पडतात.

समुद्रावरील वादळाला 'तुफान' म्हणतात. त्याने समुद्र फार खवळतो. पाण्याच्या डोंगरासारख्या मोठ्या लाटा येतात. जहाजें खडकांवर आपटून फुटतात, किंवा बुडून जातात व पुष्कळ लोक मरतात !

वाळवंटांतील वावटळहि अशीच भयंकर असते. तेथे वाळूचा मोठा थोरला डोंगरच वाऱ्याच्या जोराने गरगरा फिरत, दूर जाऊन कोठें तरी आपटतो. अशा डोंगराखाली पुष्कळ वेळा माणसें, जनावरें, घरें वगैरे दबतात !

मौज आहे की नाही ? मित्र तोच व शत्रुहि तोच !

प्रश्न

(१) होय किंवा नाही हें सांगा.

(१) वाऱ्याने चक्की चालते ?........

(२) वारा नेहमी आपल्यावर उपकार करतो ?......

(२) स्मृति चांचणी—

(१) तुफान, वावटळ, वादळ कशाला म्हणतात ?

(२) वाऱ्याचीं कामें सांगा.

(३) वारा मित्र कसा व शत्रु कसा ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा अठ्ठाविसावा.

गड आला, पण सिंह गेला.



मोंगलांनी मराठ्यांचा कोंडाणा किल्ला जिंकून घेतला होता. तो परत केव्हा घेईन, असें शिवाजीमहाराजांस झालें होतें. हें काम करण्यासाठी तानाजीला पाठविण्याचें त्यांनी ठरविलें.

कोंडाणा फार कठीण किल्ला होता. तो डोंगरावर असून त्याच्या तटावर चढणें फारच कठीण होतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

किल्ल्यावर उदेभान नांवाचा बाटलेला शूर रजपूत सरदार किल्लेदार होता.

निवडलेले व शूर मावळे शिपाई घेऊन तानाजी गुपचुप रात्रीचा गडाच्या पायथ्याशीं गेला. मग त्याने एका घोरपडीच्या कमरेस दोर बांधून तिला गडाच्या तटावर सोडलें. घोरपड चढून वरच्या बाजूस गेली. तिने आपलीं नखें गडाच्या तटावर घट्ट रोविलीं. मग तिला बांधलेल्या दोराला धरून तानाजीचे शिपाई भराभर गडाचा तट चढून वर गेले.

इतक्यांत गडावरील पहारेकरी जागे झाले. त्यांनी शिंग फुंकून सगळी फौज जागी केली.

मग मराठे व मोंगल फौजेची खूप जोराची लढाई झाली. लढाईत तानाजीला तरवारीचा मार लागून तो मरून पडला.

आपला सेनापति पडला म्हणून मराठी शिपाई पळूं लागले. पण तानाजीचा भाऊ सूर्याजी पुढे होऊन म्हणाला, "दोस्त हो, असें भागूबाईसारखे पळतां काय ! तुमचा वीर मरेतोंपर्यंत लढला व तुम्ही पळून जाणार ? चला, मर्दासारखे लढा व मारा किंवा मरा ! अपयश

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घेऊन शिवाजी महाराजांना तोंड दाखविणार काय ?"

या भाषणाने शिपायांस हिंमत आली. ते मागे परत फिरले व त्यांनी असा जोराने हल्ला केला की, शत्रूची दाणादाण झाली. खुद्द उदेभान मरून पडला व किल्ला जिंकला गेला. ही बातमी रायगड येथे शिवाजीमहाराजांना कळावी म्हणून एक गवताची गंजी पेटवून उजेड केला.

दुसऱ्या दिवशीं शिवाजीमहाराजांस कळलें की, किल्ला जिंकला. पण तानाजी मरण पावला. तेव्हा त्यांना फार दुःख झालें. ते म्हणाले, "गड आला, पण सिंह गेला !"

प्रश्न

(१) खरें किंवा खोटें हें लिहा.

(१) कोंडाणा किल्ला फार कठीण होता.........

(२) तानाजीचे शिपाई गडावर भराभर चढून गेले....

(२) चूक किंवा बरोबर हें लिहा.

(१) मराठे व मोंगल शिपायांची खूप जोराची लढाई झाली नाही.........

(२) मराठे शिपायांनी मोंगलाची दाणादाण केली....

(३) स्मृति चांचणी—

(१) तानाजीच्या भावाने शिपायांना काय म्हटलें ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा एकोणतिसावा.

अंगाई गीत.

[चाल—पाळण्याची]

जो जो जो जो रे ॥ ध्रु० ॥
घरटीं तीं । फांद्यांमधुनी झुलती ।
निजले चिउकाऊ ॥ निजविती ।
झुळुका गाउनि गीतीं ।
गाणीं किति गाऊं ॥ जो जो० ॥ १ ॥
हम्मा ही । दूदू देउनि पाही ॥
निजल्या गोठ्यांत । रे छबिल्या ।
राघू मैना निजल्या । अपुल्या पिंजऱ्यांत ॥ जो० ॥ २ ॥
या वेळीं । निजलीं झाडें वेली ।
निजला चांदोबा । रात्र किती ।
चढली काळी भंवतीं ।
आला बागुलबा ! ॥ जो० ॥ ३ ॥
शुक गडे । झालें जिकडे तिकडे ।
झोंप न तुज बाळा । खिदळशी ।
खुदु खुदु खुदु खुदु हंससी ।
एकच हा चाळा ॥ जो जो जो जो रे० ॥ ४ ॥

भा. रा. तांबे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा तिसावा.

लोकर.

मी थंडीचे दिवसांत लोकरीचा कोट घालतों. पायांत लोकरीचे मोजेहि घालतों. बाबाहि तसेंच करतात. आईहि गरम पोलकें घालते व शाल पांघरते.

मीं आईला विचारलें, "आई, ही लोकर कोठून येते?"

आईः—बाळ, आपणाला जसे थंडींत गरम कपडे लागतात, तसे जनावरांनाहि लागतात. पण ते त्यांना अंगचेच कपडे दिले आहेत. अंगावरची जाड कातडी व त्यावरील केस हेच त्यांचे गरम कपडे ! तूं मेंढ्यांचे अंगावर कसे मऊ व उबदार केस असतात पाहिलेंस ना ? त्यांनाच आपण 'लोकर' म्हणतों. थंडीचे दिवस जाऊन उन्हाळा आला म्हणजे यापैकी बरीच लोकर कातरून घेतात व मग तिचे कपडे बनवितात !

मीः—हें कसें होईल ? मेंढ्यांची लोकर खरखरीत व घाणेरडी असते. तिचा माझा कोट व तुझी शाल कशीं बनतील ?

आईः—खरी आहे तुझी शंका, पण मेंढ्यांवरील

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लोकर कातरून घेतल्यावर प्रथम तिला स्वच्छ धुतात. धुतल्यावर तिला रंगवितात. रंगविल्यावर मग तिचें सूत काढतात. ही पहा एक सुताची गुंडी. या सुतानेच मी तुझे मोजे व बाळाचा फ्राक विणला. सुतापासून कापड बनवितात. शिंपी त्या कापडाचे कपडे करतो.

मीः—पण इतक्या सगळ्या लोकांना कापड मिळायला किती तरी मेंढ्यांची लोकर काढावी लागत असेल ?

आईः—होय बाळ, यासाठी लाखों मेंढ्यांची लोकर लागते. हजारों लोक मेंढ्या पाळून त्यांची लोकर विकण्याचा धंदा करतात. अलीकडे मेंढ्यांवरील लोकर कातरणें, ती धुणें, रंगविणें, तिचें सूत काढणें व विणून कापड बनविणें हीं सगळीं कामें यंत्रांनी होतात.

प्रश्न

(१) चुकीच्या गोष्टी खोडून काढा.

(१) मेंढ्यांचे अंगावर मऊ व उबदार केस नसतात...

(२) मेंढ्यांच्या केसांना लोकर म्हणतात............

(२) शब्दांचा वाक्यांत उपयोग करा.

कातरणें, रंगविणें, धुणें, काढणें, बनविणें.

(३) रिकाम्या जागीं शब्द भरा.

(१) बाळ ×××× जसे थंडींत ××× कपडे लागतात, तसे ××××× हि लागतात.

(२) ×× लोकर कसली ×××× व ××× असते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा एकतिसावा.

टापटीप.

"काय करावें आता ? पेन्सिल कांही सापडत नाही." चिंतू रडकुंडीला येऊन म्हणाला. त्याला शाळेंत जावयाची तर घाई झाली होती. पाटी, दप्तर व पुस्तकें इकडून तिकडून त्याने गोळा केलीं होतीं. पण पेन्सिल मात्र सापडेना.

तो रडकें तोंड करून वडिलांकडे गेला. "बाबा ! मला एक पेन्सिल द्या हो लवकर. माझी पेन्सिल कोठें सापडत नाही. मघाशीं बेबीने घेतली की काय, कोण जाणे ?"

"टाकली असशील तूंच कोठें तरी व बेबीवर नांव घालतो आहेस ? चल पाहूं. मी पाहातों कोठें आहे तुझी पेन्सिल ती !"

चिंतू मुकाट्याने बापाबरोबर आपल्या अभ्यासाच्या जागेकडे गेला. बैठकीवर कागद, पुस्तकें इकडे तिकडे पडलीं होतीं. नुकतीच शाई सांडून सतरंजी खराब झाली होती. कांही कपडे जवळच्या खुंटाळ्यावर, व कांही जमिनीवरच पडले होते ! त्यांतच गोट्या, विटीदांडू वगैरे खेळाचें सामान पडलें होतें ! असा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तेथे एकच गोंधळ होता.

"वा: ! चिंतू, काय गबाळपणा हा ! अशा गोंधळांत तुझी पेन्सिल कशी सापडावी ? पेन्सिल व लेखण्या ठेवण्यासाठी मी तुला एक कागदाची पिशवी करून दिली आहे ना ? त्यांत कां नाही ठेवलीस ती ? तुझा हात पोचावा म्हणून इतकें खाली हें खुंटाळें लावून दिलें आहे ना ! पण तुझे कपडे जमिनीवरच पडले आहेत. हा शाईचा डाग अगदी ताजा व ओलाच दिसत आहे अजून ! बहुतकरून पेन्सिल शोधतांनाच ही दौत पडली असावी. तुला हें जें लहानसें कपाट दिलें आहे, तें कशाकरितां ? पुस्तकें, कागद, वह्या, दौत वगैरे जेथल्या तेथे बरोबर राहावी म्हणून ना ? पण तूं यांचा उपयोग करशील तेव्हा !"

असें बोलतां बोलतां बाबांनी सतरंजी जराशी वर उचलली. तों तिच्याखाली पेन्सिल सापडली.

"पाहिलेंस चिंतू ! म्हटलें होतें ना तुझी पेन्सिल तेथेच कोठें तरी असेल म्हणून ? घे ही आता व जा शाळेंत. पण आता तरी ध्यानांत ठेव. वस्तु जेथल्यां तेथे ठेवल्या म्हणजे वेळेला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सापडतात, चांगल्या राहातात व हारवत नाहीत. याला टापटीप म्हणतात. तुला गबाळ्या चिंतू असें म्हणवून घ्यावयाचें नाहींना ?

चिंतू अगदी लाजला होता. कांहीं न बोलतां तो शाळेकडे पळाला. मात्र त्या दिवसापासून तो टापटिपीने वागूं लागला.

प्रश्न

(१) होय किंवा नाहीं हें सांगा.

(१) चिंतूची पेन्सिल बेबीने घेतली होती ?......

(२) बैठकीवर कागद, पुस्तकें इकडे तिकडे पडलीं होतीं ?...........

(२) चूक किंवा बरोबर हें सांगा.

(१) चिंतू त्या दिवसापासून टापटिपीने वागूं लागला..........

(२) शाई सांडून सतरंजी खराब झाली नव्हती ...

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा बत्तिसावा.

रणशूर बाजी देशपांडे.

मुलांनो, श्रीशिवाजीमहाराजांच्या पदरीं कित्येक शूर व धाडसी सरदार होऊन गेले. त्यांत तानाजी प्रमाणेच बाजीप्रभू देशपांडे यांचें नांव फार प्रसिद्ध आहे.

बाजीप्रभु हा पुण्याच्या आसपासच्या मावळ प्रांताचा राहाणारा. तो प्रथम हिरडस येथील देशमुखांच्या नोकरीस होता. पुढे तो जावळी येथील मोऱ्यांच्या बाजूने शिवाजी महाराजांशीं लढला. तेव्हा त्याचा शूरपणा महाराजांना दिसून आला. महाराजांना असा शूर सरदार आपल्या जवळ असावा असें वाटलें. बाजीलाहि असा योग्य धनी मिळाल्यामुळे आनंद वाटला व त्याने महाराजांची चाकरी पतकरली.

पुढे अफजलखानाच्या मरणानंतर शिवाजी महाराजांच्या बंदोबस्ताकरितां विजापूरच्या सुलतानाने पुष्कळ शिपाई पाठविले. या शिपायानी महाराज पन्हाळगडावर असतां त्याला गराडा घातला. जवळ शिपाई थोडे व शत्रूचे शिपाई पुष्कळ. अशा स्थितींत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

काय करावें, ही मोठी पंचाईत पडली. शेवटी मोठ्या युक्तीने महाराज किल्ल्यावरून निसटले व रांगणा किल्ल्यावर निघून गेले. या वेळींच बाजी प्रभूची खरी परीक्षा झाली.

शत्रू आपल्या पाठीमागे लागणार हें महाराज ओळखूनच होते. रांगणा व पन्हाळा यांमधील घाटांत एक फारच अरुंद अशी खिंड आहे. तिला 'पावनखिंड' अथवा 'घोडखिंड' असें म्हणतात. महाराज रांगण्यावर जाऊन सुखरूप पोचेपर्यंत या खिंडींत शत्रूच्या शिपायांना अडवून धरणें जरूर होतें. हें कठीण काम महाराजांनी बाजी देशपांडे यांजकडे दिलें. बाजी म्हणाला, "महाराज आपण काळजी करूं नये. माझ्या जिवांत जीव आहे तोंपर्यंत मीं शत्रूला एक पाऊल पुढे सरकूं देणार नाही."

थोड्याच वेळांत विजापुरी शिपाई आले. त्यांना बाजीने खिंडींत अडविलें व मारामारीस सुरुवात झाली. शत्रूने बाजीकडील पुष्कळ लोक मारले. कांही जखमी होऊन पडले. पण त्याने शत्रूंना एक पाऊलहि पुढे सरकूं दिलें नाही. महाराज

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गडावर पोंचल्याची बातमी केव्हा येते, इकडे बाजीचें लक्ष लागलें होतें. तो जोराने लढत होता. इतक्यांत एक बंदुकीची गोळी सूं सूं करीत आली. व ती छातींत लागून बाजी खाली पडला. "अरेरे! आता आपलें काम पुरें होत नाही ना!" असें वाटून तो फार दुःखी झाला. पण—हें काय? धाड, धडड्‌ धाड्‌! तोफांचे आवाज! महाराज किल्ल्यावर पोंचल्याची ती खूण होती. "वाः! शिवरायांचा जय असो. आता माझा प्राण सुखाने जाईल"—असें म्हणून बाजीने प्राण सोडला.

असे खंदे वीर होते म्हणून च शिवरायांना स्वराज्य स्थापतां आलें!

प्रश्न

(१) स्मृति चांचणी—

(१) बाजी देशपांडे पूर्वी कोणाकडे नोकर होते?

(२) बाजी प्रभूच्या लढाईची गोष्ट सांगा.

(३) बाजी प्रभू मरतांना काय म्हणाला?

(२) चुकीचे शब्द बरोबर लिहा.

सवराज्य, दुखी, शतरू, परासद्ध.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा तेहतिसावा.

ओझें उचलण्याची युक्ति.

गोपाळराव आपल्या धाकट्या मधूला बरोबर घेऊन फिरावयास गेले. त्यांच्या बंगल्याचें काम चालूं होतें. तिकडेच ते मधूला घेऊन गेले. तेथे बंगल्यासाठी मोठमोठाले दगड आणून ठेवले होते, ते मधूने पाहिले. मधू गोपाळरावांस म्हणाला, "बाबा, हे एवढे मोठाले दगड वर उचलून कसे नेतात हो ?" गोपाळराव म्हणाले, "तो रामा मजूर पहा. एकटाच केवढा



थोरला दगड उचलून ढकलीत आणीत आहे. तो मोठ्या दगडाखाली पहारीचें एक टोक घालतो व त्या पहारीखाली एक लहानसा दगड ठेवतो. मग पहारीचें दुसरें टोक दोन्ही हातांनी दाबतो. त्याबरोबर तो मोठा दगड उलटून पुढे ढकलला जातो. पहारीखाली जो लहानसा दगड ठेवतात

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यास 'टेकू' असें म्हणतात. व अशा तऱ्हेने उपयोगांत आणलेल्या पहारीसारख्या दांड्याला 'तरफ' म्हणतात.



आता दुसरीकडे चल पाहूं. ही लोखंडी तुळई पहा. ती बंगल्याच्या वरच्या मजल्यावर कशी उचलून नेतात ? हें दोन खांबांवर एक चाक ठेवलें आहे. त्यावरून एक जाड दोर खाली सोडला आहे. त्या दोराने तुळई बांधून दुसरें टोक माणसें ओढतात. त्यामुळे एवढें वजन चाकावरून थोड्या मेहनतीने वर उचललें जातें."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मधू म्हणाला, "बाबा ही चांगली युक्ति आहे. आपल्या बागेंतील विहिरीवर मोटेचें चाक लावलें आहे त्यावरून पाण्याने भरलेली मोट ओढणें बैलांना असेंच सोपें जात असेल नाही ?"

"हो, मधू, तूं बरोबर ओळखलेंस. आपल्या आवारांतील विहिरींतून पाणी काढण्यासाठी चाक लावलें आहे ना ? त्यावरून पाण्याने भरलेली बादली वर काढणें हलकें जातें. अशा रीतीने वजन उचलण्याच्या चाकाला 'कप्पी' म्हणतात. मधू, अशा मोठ्या व वजनदार वस्तु कशा उचलल्या जातात, हें आता तुला समजलें ना ?"

प्रश्न

(१) पुढील वाक्यें बरोबर लिहून दाखवा.

(१) गोपाळराव गेले आपल्या घेऊन फिरावयास धाकट्या बरोबर मधूला.

(२) वजन कप्पी चाकाला म्हणतात उचलण्याच्या.

(२) खरें किंवा खोटें हें लिहा.

(१) पहारीसारख्या दांड्याला तरफ म्हणतात...

(२) पहारीखाली जो लहानसा दगड ठेवतात त्यास कप्पी म्हणतात..........

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा चौतिसावा.

आई मज करमत नाही.

[चाल—असा धरि छंद]

काय करुं आई ?। अगदीं मज करमत नाही ॥ ध्रु० ॥
चेंडू अडगळींत हारपला ।
दांडू चुलींत चुकुनी जळला ।
गाडा चालुनि चालुनि थकला ।
न सुचे कांही । आई, मज करमत नाही ॥ १ ॥
घोडा काठीचा तूं दिधला ।
तो बघ कमळीने पळवीला ।
आता जाउं कसा गावाला ? । न सुचे० ॥ २ ॥
फुटला बाहुलिचा बघ डोळा ।
पहा बाहुला लंगडा झाला ।
तयार दोघेहि न लग्नाला ॥ न सुचे० ॥ ३ ॥
मज़ जें खेळावयास मिळालें ।
चट्टा मट्टा करुनी सरलें ।
तोंडीं बत्तासे विरघळले ॥ न सुचे० ॥ ४ ॥
पुस्तक गंगूने फाडियलें ।
पाटीचे बहु तुकडे केले ।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पेन्सिल टाक खिशांतुन गळले। न सुचे० ॥ ५ ॥
बंडू शाळेंत असे गेला।
मोत्या कुत्रा निजला अपुला।
खेळायाला कुणि नच मजला ॥ न सुचे० ॥ ६ ॥
माझें लक्ष न कोठें लागे।
झोपहि मजला येईना गे।
तर मज छान गोष्ट तरि सांगे ॥ न सुचे० ॥ ७ ॥
आई:—खुळ्या ! तुज कांही।
काम काय उरलें नाही ? ॥
खाशी गोष्ट सांगु का तुजला ?।
तर मग जाई तूं शाळेला।
तेथे करमेल तुला बाळा ॥
भुणभुण रे ही ! मज मुळी आवडत नाही ॥

ना. गं. लिमये.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घडा पसतिसावा.

कापसाचें शेत.

दामू आपल्या दादाबरोबर अकोल्यास मावशीकडे आला होता. दामूचें घर रायपुरास होतें. तो अकोल्यास यावयास निघाला, तेव्हा त्याला नागपुराचे जवळपास रेलवेच्या काठच्या शेतांत जिकडे तिकडे कापूस लागलेलीं झाडें दिसलीं. दामूने कापसाचीं झाडें यापूर्वीं कधी पाहिलीं नव्हतीं. कापसाचें शेत पाहून त्याला मोठी गंमत वाटली व तो म्हणाला, "दादा, हीं झाडें कसलीं आहेत! व ह्यांना पांढरें पांढरें काय लागलें आहे?"



दादा—अरे, हीं कापसाचीं झाडें आहेत व त्यांना हीं कापसाचीं बोंडें लागलेलीं आहेत. कांही

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बोंडें उन्हामुळे वाळून फुटलीं असून त्यांतून कापूस बाहेर निघाला आहे.

आपण अकोल्यास मावशीचे घरीं गेलों म्हणजे एक दिवस शेतांत जाऊं व कापसाचीं झाडें पाहूं !

ठरल्याप्रमाणे दादा दामूला बरोबर घेऊन शेतांत गेले. प्रथम त्यांनी कपाशीचें पान दाखविलें. "हा पाहा कपाशीच्या पानाचा आकार. त्याचे पाच भाग झाले आहेत. हें कपाशीचें फूल. यापासूनच कपाशीचें बोंड तयार होतें. नंतर फूल गळून जातें. बोंड तयार झाल्यावर तें उन्हामुळे फुटतें व त्यांतून पांढरा कापूस बाहेर पडतो. हें शेत पहा. जिकडे तिकडे पांढरें शुभ्र झालेलें दिसतें. दुपारचे वेळीं शेतकऱ्यांच्या बायका, मुलें कापूस वेचून नेतात.

कापूस वेचल्यानंतर तो वटावा लागतो. ह्या पहा कापसाच्या बिया. ह्यांना 'सरक्या' म्हणतात. सरकी काढलेल्या कापसास 'रुई' म्हणतात. रुईचें पेळू करून त्याचें चरख्यावर सूत काढतात. मग त्याचें मागावर कापड विणतात."

दामू--पण दादा ह्या सरक्या कधीं पेरतात ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दादा—बरा प्रश्न केलास. पावसाळा लागण्या पूर्वी सरक्यांना माती लावून वाळवितात. मग त्या वखराने किंवा तिफणीने शेतांत पेरतात. बिया पेरल्यापासून तीन चार महिन्यांनी कापूस निघतो. कापसास पाऊस फार लागत नाही व जमीन काळी लागते. म्हणून तो इकडे वऱ्हाडांत फार पिकतो. आपल्या रायपूरकडे पाऊस फार व जमीन तांबूस. तिकडे कापूस मुळीच होत नाही, पण धान चांगलें पिकतें.

प्रश्न

(१) बरोबर असेल तेथे ✓ अशी व चूक असेल तेथे × अशी खूण करा.

(१) दामूचें घर रायपुरास होतें.

(२) वऱ्हाडांत धान चांगलें पिकतें.

(३) कापूस वेचल्यानंतर तो वटावा लागतो.

(२) खरें किंवा खोटें हें लिहा.

(१) सरकी काढलेल्या कापसास रुई म्हणतात....

(२) रायपूरकडे पाऊस थोडा पडतो.........

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा छत्तिसावा.

दामू उशीरे.

दामू शाळेला रोज उशिराने यावयाचा. त्याला मास्तरांनी पुष्कळ सांगितलें; पण कांही उपयोग झाला नाही. यामुळे वर्गांत तो इतरांच्या मागे राही.

एके दिवशीं मास्तर म्हणाले, "मुलांनो, उद्या आपण सर्व रामटेकच्या जत्रेस जाऊं. आपणांस आगगाडीने जावयाचें आहे. गाडी बरोबर सकाळचे आठ वाजतां सुटते. तर तुम्ही सर्वजण शाळेंत बरोबर सात वाजतां जमा; म्हणजे येथून आपण सर्व स्टेशनावर जाऊं."

त्याप्रमाणे दुसऱ्या दिवशीं सर्व मुलें सात वाजतां गोळा झालीं. पण दामू कोठें दिसेना ? मास्तर म्हणाले, "काय करावें या दामूला ? आता फार तर पंधरा मिनिटें त्याची वाट पाहतां येईल. मग आपणांस निघालेंच पाहिजे."

पंधरा मिनिटें होऊन गेलीं, तरी दामूचा पत्ता नाही. मास्तर मुलांना घेऊन स्टेशनावर गेले.

मास्तरांनी दामूखेरीज बाकी सर्वांचीं तिकिटें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

काढली. घण घण घंटा झाली व भक भक करीत गाडी स्टेशनावर आली ! मुलें व मास्तर भराभर गाडींत शिरले. पुनः घंटा झाली. गाडीने शिटी दिली व ती भक भक करीत निघाली.



पण हा कोण प्लॅटफॉर्मवरून धावत धावत येत आहे ! हा तर दामू ! "अहो थांबा, अहो थांबा, मला यावयाचें आहे !" असें ओरडत तो अगदी गाडीजवळ आला. पण गाडी कसची थांबते ! दामूला स्टेशनवरील एका शिपायाने मागे ओढलें व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तो म्हणाला, "कुठें चाललास पुढे मरायला ? वेळेवर यावयास काय झालें होतें ?"

दामूचे डोळे पाण्याने भरून आले. घरीं गेल्यावर बाबा म्हणाले, "कां ? गाडी चुकली वाटतें ? बरी अद्दल घडली तुला !"

दामू काय उत्तर देणार ? त्याचें तोंड बंदच झालें.

मुलें रामटेकहून परत आलीं; त्यांनी मौजेची हकीकत सांगितली. ती ऐकून तर त्याला फारच वाईट वाटलें. एका वात्रट मुलाने तर "दामू उशीरे" असें नांव त्याला दिलें. दामू चरफडला; पण उपयोग काय ? त्या दिवसापासून मात्र दामूने उशीर लावण्याची वाईट सवय टाकून दिली.

प्रश्न

(१) खरें किंवा खोटें हें लिहा.

(१) दामू शाळेला रोज उशिराने येत नसे.........

(२) ती मौज ऐकून दामूला वाईट वाटलें.........

(२) स्मृति चांचणी—

(१) मुलांनीं दामूला कोणतें नांव दिलें होतें ?......

(२) दामू रामटेकची जत्रा पाहावयास कां गेला नाही ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा सदतिसावा.

दळण्याची चक्की.

बळिरामपंत हे वर्धेस नोकरीनिमित्त राहात होते. एकदा त्यांच्याकडे खेडेगावची कांहीं पाहुणे मंडळी आली होती. त्यांच्याशीं पंत गप्पा गोष्टी करीत बसले असतांना त्यांची मुलगी शांती दळणाकरितां पैसे मागावयास आली. पंतांनी शांतीस विचारलें, "किती धान्य दळावयास न्यावयाचें आहे?" शांती म्हणाली, "एक कुडव गहू न्यावयाचे आहेत." पंतांनी शांतीला एक आणा दिला. शांती एक कुडव गहू दळण्याकरितां घेऊन गेली व लगेच थोड्या वेळाने कणिक घेऊन आली.

शांती इतक्या लवकर एक कुडव गहू दळून कशी आली ? याचें मधूला मोठें नवल वाटलें. तो आपल्या वडिलांस म्हणाला, "बाबा, शांतीने इतके गहू थोड्या वेळांत कसे दळून आणले हो ? आपल्या गावीं तर एवढे गहूं दळून आणावयाला किती तरी वेळ लागतो." मधूचें बोलणें ऐकून बळिरामपंत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म्हणाले. "मधू तुझ्या गावीं धान्य जात्यावर हाताने दळतात. त्यामुळे पुष्कळ वेळ लागतो. पण येथे पिठाच्या चक्क्या आहेत. त्या आगीने चालतात. त्यामुळे थोड्या वेळांत पुष्कळ धान्य दळलें जातें. चल, मी तुला दळण्याची चक्की दाखवतों.



ही पहा पिठाची चक्की, हा पट्टा आगीने चालणाऱ्या एंजिनाचे चाकावर चढविला आहे. एंजिनांत मातीचें तेल टाकून चक्की चालवितात. एंजिन सुरू झालें म्हणजे हें मोठें चाक जोराने फिरूं लागतें. नंतर हा पट्टा इकडे लहान दांड्यावर चढविला आहे त्यामुळे हा दांडाहि गरगर फिरूं लागतो. हा वाटोळा डबा दिसतोना? याच्या आंत जात्याप्रमाणेच दोन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाटोळे दगड असतात, त्यांना 'तळ्या' म्हणतात. तळ्या आंतल्या बाजूस असतात व धान्य टाकण्याची टाकी ही वर लागलेली आहे. इच्यांत एकदमच सारें धान्य टाकून दिलें की, खाली असलेल्या बारीक छिद्रांतून थोडथोडें धान्य जात्यांत पडतें व त्याचें भराभर पीठ होतें. चाक जोराने चालत असल्यामुळे धान्य लवकर दळलें जातें."

मधूला ही दळणाची चक्की पाहून मोठी मौज वाटली. तो म्हणाला, "बाबा, तुम्ही अशी चक्की आपल्या गावी आणा ना हो ?"

बाबा—होय बाळ ! आपल्या गावांत लवकरच अशी एक चक्की निघणार आहे.

प्रश्न

(१) खरें किंवा खोटें हें लिहा.

(१) शांती एक कुडव गहू दळण्याकरितां घेऊन गेली...............

(२) पिठाची चक्की हाताने चालवावी लागते......

(२) शब्दांचा वाक्यांत उपयोग करा.

पट्टा, एंजिन, चक्की, टाकी, जातें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा अडतिसावा.

खार.

(दोहा)



लहान सुंदर गोजिरवाणी दिसे कशी ही खार
गुलगुलीत हें अंग मजेचें शेपुट गोंडेदार ॥ १ ॥
लहान डोळे लुकलुक बघती, दृष्टि किती तरी छान
खुटकन कोठें सहज वाजलें तरिहि ऐकती कान ॥ २ ॥
उभें करोनी शेपुट बैसे ऐटीमध्ये फार
मालकीण ही जणुं रानाची दिसे अशी ही खार ॥ ३ ॥
सर सर सर सर पळत जातसे रस्त्यांतुनि ही पार
भर भर भर भर तरुवरिं चढते शेंड्यावर ही खार ॥४॥
चळवळ चळवळ सदा करी क्षणभर नाही स्थीर
स्वस्थ बसाया जरा तरी कुठला इजला धीर ॥ ५ ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

क्षणांत बसते शांत, जणों चित्र मजेचें छान
क्षणांत पळते कशी पहा उभारोनि ही कान ॥ ६ ॥
दिवसभरी ही वनीं फिरे, फळें जमविते गोड
गोड गोड बहु खाण्याची इजला भारी खोड ॥ ७ ॥
काम करी ही आनंदें मधेंच खेळे खेळ
दवडी नच ही कधी मुळीं फुकट आपला वेळ ॥ ८ ॥
किती खिळाडू गमतीची सुंदर भारी खार
तुझ्या गुणाला रूपाला नसे गडे गे पार ॥ ९ ॥
भारी अचपळ जरि असती गरिब तरी तूं फार
येइन भेटायास वनीं, तुजला वारंवार ॥ १० ॥

म. क. कारखानीस.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दुबळी श्रीमंती व धट्टीकट्टी गरीबी.

एकदा एक गरीब शेतकरी शेजारच्या गावीं कांही कामासाठी निघाला होता. वाटेंत तो एका नदीकाठीं न्याहारी करून झाडाखाली विश्रांति घेत बसला.

इतक्यांत एक श्रीमंत गृहस्थ तेथे येऊन पोचला. त्याच्या नोकरांनी नदीकाठीं वाळवंटावर छानदार सतरंजी पसरली. मग दोघा नोकरांच्या खांद्यावर हात टाकून तो श्रीमंत गृहस्थ सतरंजी-वर येऊन तक्क्याशीं टेंकून बसला.

शेतकरी हें सर्व पाहात होता. त्याला वाटलें, "किती नशीबवान आहे हा माणूस ! चालतां चालतां माझे पाय दुखूं लागले, अशी सुंदर घोड्याची गाडी मजपाशीं असती तर किती मजा झाली असती ! काय चैन आहे या गृहस्थाची ! दोन पावलें चालावयाचें झालें तरी नोकरांच्या खांद्यावर टेकून ! बसावयास मऊ गादी व टेकावयाला तक्क्ये ! खावयास लाडू, पुरी ! दिवसभर राबावें तेव्हा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कोठें मला कांदा भाकरी मिळते !"

आपणाकडे टक लावून पाहाणाऱ्या या शेतकऱ्याच्या मनांत कसले विचार चालले असावे, हें त्या श्रीमंत गृहस्थाने ताडलें. त्याने शेतकऱ्याला जवळ बोलावलें व विचारलें—

"काय रे बाबा ? माझे गाडीघोडे व हाथाट पाहून तुला माझा हेवा वाटत असेल नव्हे ?"

शेतकरी म्हणाला, "होय साहेब. वाटला खरा; आम्हां गरिबांना कोठच्या असल्या वस्तु मिळायला ?"

हें ऐकून श्रीमंत गृहस्थ म्हणाला—

"अरेरे ! किती चुकीची समजूत आहे तुझी ! तुला वाटतें तसा मी सुखी नाही. देवाने मला खूप पैसा दिला आहे. पण त्यापासून मला मुळीच सुख मिळत नाही. मी या नोकरांच्या खांद्यांवर टेकून चालतों, तें चैनीसाठी नव्हे; तर संधिवाताने माझे पाय आखडून गेले आहेत म्हणून. पायांतून सारख्या कळा येतात, त्यामुळे रात्रीं चांगली झोप देखील लागत नाही. मग माझा पलंग व मऊ बिछाना यांचा काय उपयोग ? तोच माझा गरीब नोकर पहा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जरा जमिनीवर आडवा झाला की घोरूं लागतो. खाण्यापिण्याची गोष्ट अशीच. आज कित्येक दिवसांत मला भूक अशी वाटत नाहीच. त्यामुळे गोड गोड अशा चांगल्या अन्नाला देखील चव लागत नाही. पण माझे नोकर जाड्याभरड्या भाकरीच खूप पोटभर खातात! मग सांग बरें! आता तुला माझा हेवा वाटतो का?"

शेतकरी म्हणाला, "नाही महाराज. माझी गरीबी मला पतकरली. पण असली दुबळी श्रीमंती मला नको!"

मुलांनो, तुम्ही त्या श्रीमंत माणसाप्रमाणे रोगी व लंगडे होऊं इच्छितां, का त्या शेतकऱ्यासारखे धडधाकट व आनंदी होऊं इच्छितां? श्रीमंती ही कांही वाईट नाही. ती मिळविण्याचा प्रत्येकाने प्रयत्न करावा. पण त्याहूनहि शरीरसंपत्ति ही श्रेष्ठ होय व ती मिळविणें हें तुमच्या हातचें आहे.

प्रश्न

(१) चुकीचीं वाक्यें खोडा.

(१) श्रीमंत मनुष्य एकटाच सतरंजीवर आला....

(२) शरीर संपत्तीपेक्षा पैशांची श्रीमंती श्रेष्ठ आहे...

(२) स्मृति चांचणी—

(१) तुम्ही कोणत्या माणसाप्रमाणे होऊं इच्छितां? कां?

(२) धडधाकट व आनंदी होणें हें आपल्या हातीं कसें आहे?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घडा चाळिसावा.

झोपडींतील पाहुणचार.

यमू व वारू या तिसऱ्या वर्गांत शिकत होत्या. दोघीहि हुशार असल्यामुळे त्यांची फार मैत्री जमली. यमू गावच्या पाटलांची मुलगी, घरची श्रीमंतच होती. वारूचा बाप शेतकामांतील मजुरी करून पोट भरी. तरी यशवंतराव पाटलांच्या आग्रहावरून त्याने आपल्या मुलीस शाळेंत घातलें होतें व म्हणूनच यमूची व वारूची दाट ओळख झाली होती. घरीं सणवार असला की, यमूने वारूला जेवावयास बोलवावें. यमूचे आईबापहि तिला मोठ्या प्रेमाने वागवीत.

वारूला वाटे, आपण नेहमी यमूच्या घरीं जातों. एखादे वेळीं तरी तिला आपल्या घरची मीठ भाकर खावयास बोलवायला नको का ? म्हणून तिने संक्रांतीच्या दिवशीं यमूला भोजनाला बोलविलें. यमूनेहि आनंदाने येण्याचें कबूल केलें.

वारू स्वतः जाऊन यमूस आपल्या घरीं घेऊन आली. ती म्हणाली, "यमूताई, आमची ही गरीबांची झोपडी पाहून तुला कसेंसेंच वाटत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असेल नाही बरें ?"

यमू—छेः छेः तसें मुळीच नाही. येथे येण्यांत मला खरोखर आनंद होत आहे. दाखव पाहूं मला तुझें घर.

वारू—अग, दाखवायला आहे काय फार त्यांत ? या पहा दोनच तर खोल्या आहेत आमच्या घराला. ही पुढची ओसरी म्हणजेच आमचा दिवाणखाना. आला गेला पाहुणा यांचा सत्कार आमचे बाबा येथेच करतात. ही पहा उजवीकडची खोली; आम्हीं सर्वजण—आई, बाबा, मी व माझीं तिन्ही भावंडें—येथेच निजतों. डावीकडली खोली म्हणजे आमचें स्वयंपाकघर. आमच्या येथे वेगळ्या कोठीच्या खोलीची गरजच पडत नाही. कारण आठवड्याचा पगार मिळाला म्हणजे फारतर आठवडाभर पुरेल येवढें धान्य, मीठ मिरची आणावयाची. तसेंच येथे वेगळें नहाणीघर सुद्धा तुला नाही दिसावयाचें, हा पहा. मागच्या बाजूस एक धोंडा आहे. त्याजवळूनच एक लहानशी नाली काढून दिली आहे. पुढे कांस्याकुट्यांचें कुंपण लावून थोडा आडोसा केला आहे. हेंच आमचे नहाणीघर.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

थांतील सांडपाणी व्यर्थ जाऊं नये म्हणून आम्हीं जवळच थोडें अळूं लावलें आहे व चार दोन फुलझाडें व भाजीपाल्याचे वेल लावले आहेत. हाच आमचा बगीचा. पुढील ओसरीसमोरची लहानशी मोकळी जागाहि जरा साफसूफ करून व तिच्या भोवती कुंपण घालून आम्हीं उपयोगांत आणली आहे.

हें आमचें अंगण. उन्हाळ्यांत रात्रीं आम्हीं येथेच उघड्यावर निजतों. हा आमच्या गाईचा गोठा. आमच्या बाबांनीं गरीबी असूनहि काटकसर करून ही गाय पाळली आहे. त्यामुळे आम्हांला चांगलें, स्वच्छ दूध मात्र आज तुला देतां येईल.

यमू—खरोखर, वारूताई, लहानच खरें, पण तुझें घर स्वच्छ व व्यवस्थित दिसत आहे. कोण स्वच्छ ठेवतें हें ?

वारू—कोण म्हणजे ? आम्हींच. आमच्या घरीं नोकर थोडाच आहे, यमूताई ? आम्हांला आईने व बाबांनी कामें वांटून दिलीं आहेत. केर काढणें, कपडे धुणें, भांडीं घासणें, डाळ, तांदूळ निवडणें, गाईचा गोठा साफ करणें वगैरे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सर्व कामें आम्हीं आळीपाळीने करतों. आम्हांला ती करण्याची हौस वाटते.

यमू—वाः ! फार छान. मलासुद्धा घरचीं कामें करण्याची हौस आहे.

इतक्यांत वारूच्या आईने जेवणाची तयारी झाल्याचें सांगितलें व हा संवाद येथेच थांबून मुलें जेवणांत गुंग होऊन गेलीं !

प्रश्न

(१) खरें किंवा खोटें हें लिहा.

(१) यमू व वारू दोघीहि हुशार होत्या............

(२) वारूला वाटे यमूला आपल्या घरीं जेवावयाला बोलावूं नये...............

(२) कारण सांगा.

(१) आमच्या येथे वेगळ्या कोठीच्या खोलीची गरजच नाही. कारण..............

(२) हें आमचें अंगण उन्हाळयांत आम्हांस फार उपयोगीं पडतें कारण............

(३) स्मृति चांचणी—

(१) झोपडींतला पाहुणचार तुम्हांला आवडेल का ?

(२) वारूच्या झोपडीची माहिती सांगा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा एकेचाळिसावा.

चला, सुटी झाली !

(हावभाव करून म्हणावयाचें गाणें.)

[चाल लावणीची]



चला सुटी झाली ! आता खूप खूप खेळायचें ॥ ध्रु० ॥
मी मोटारवाला । तुम्ही गावां चला
मी पैसे घेऊन बसवायचें
मी पों पों करीत पोंचवायचें ॥ चला० ॥ १ ॥
मी बनेन एंजिन । शिटी जोरांत फुंकीन
तुम्ही सर्वांनी डबे बनायचें
तुम्ही ओळींत मागून चालायचें ॥ चला० ॥ २ ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मी बनेन चोर । तुम्ही शिपाई स्वार
मी लपून छपून निसटायचें
तुम्ही शोधून मला पकडायचें ॥ चला० ॥ ३ ॥
मी होईन भट । पोथी सांगेन झट
तुम्ही मला तूप वाढायचें
मी तट्ट असें चालयचें ॥ चला० ॥ ४ ॥
मी शाळामास्तर । तुम्ही मुलें शिकणार
मी ऐटींत आंत शिरायचें
तुम्ही एकदम उभें राहायाचें ॥ चला० ॥ ५ ॥
मिळुन करूं नाटक । सोंगें सजवून झक
मध्ये नाही कुणी हासयाचें
नाही नाही बरें भांडायचें ॥ चला० ॥ ६ ॥

वा. गो. मायदेव.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सुलभ वाचनपाठमाला

मराठी दुसरें पुस्तक

सी. पी. अँड बरार एज्युकेशनल बुकडेपो.
जबलपूर, नागपूर, उमरावती.

Weight & quality of paper	... 28 lbs. White Printing
Size of paper	... 20″×30″
Weight of cover paper	... 60 lbs.
Price	.... -/3/6

Printed by B. B. Kapur at the N. K. Press, Lucknow.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar